東京外国語大学図書館
0000557676

62

LIBRARY
No. ..........
Date. ..........

東京外国語大学
図書館蔵書
557676
平成 16 年度

सुशील स्त्रियांकरितां

# सावित्री चरित्र.

(गद्यपद्यात्मक.)

पुराणप्रसिद्ध एका महा साध्वीचें अत्यंत
मनोवेधक व बोधपर चरित्र.

जेणें होय उपरती ॥ अवगुण अवघे पालटती ॥
जेणें चुके अधोगती ॥ त्या नांव ग्रंथ ॥ १ ॥
—दासबोध—

सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी.

मुंबई
" इंडियन प्रिंटिंग " छापखान्यांत छापविलें.

सन १८९१३०

या पुस्तकाची मालकी हिंदुस्थान सरकारच्या सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें सर्वप्रकारचे हक्क " व्ही. जी. लिमये " यांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत. याची पुनरावृत्ति काढणें व यांत फेरफार करणें किंवा अन्य भाषेंत भाषांतर करणे हें सर्व प्रकारचें हक्क राखून ठेविलें आहेत.

---

## SAUBHAGYA MANDIR, PART I.

*Mr. G. M. Sathe, Registrar* of *the Native publication,* in his Report to Government for the year 1889 says :—Saubhagya Mandir, Part I. on the mansion of a married lady—Maintains that women enjoyed high estimation and respect among the ancient Aryans and relates tne duties of women as described in the Puranas and laid down by Hindu notions of propriety, and the legends of some of the chaste, virtuous, holy and saintly women to be found in different Puranas.

---

## HISTORY OF THE NTAIVE STATES PART I.

Mr *G. M. Sathe, Registrar of Native publication,* in his Report to Government for the year 1889 says :—"Among the *Historical* works of the year, *History of the Native states,* Chapter I," by Mr. Limaye, gives much useful information.

---

## HISTORY OF THE NATIVE STATES, PART II.

*Mr. G. M. Sathe, Registrar* of *Native publication,* in his Report to Government for the year 1889 says :—History of the Native States, Chapter II. A brief account of the States of Rajputana, Central India and of the Jawhar State.

---

# प्रस्तावना.

'सावित्री कथानक' हें उपाख्यानरूपानें महाभारतामध्यें आहे; परंतु एतद्विषयक जें 'वट सावित्री' नामक व्रत आमच्यामध्यें सुवासिनी स्त्रिया करीत असतात, तें कांहीं महाभारताच्या इतक्या प्राचीन कालापासून असावेंसें दिसत नाहीं. हें व्रत स्त्रियांच्या सौभाग्यरक्षणोद्देशानें प्रचारांत आणलें गेलें असल्यामुळें, या व्रताचा महिमा स्त्रियांमध्यें फार आहे. कारण आपलें सौभाग्य नष्ट होऊं नये ही इच्छा प्रत्येक स्त्रीची असावयाचीच; आणि या व्रताचरणानें स्त्रियांचें सौभाग्य इहजन्मीं नष्ट होत नाहीं, इतकेंच नव्हे तर, पुढेंहि सात जन्म त्यांना तोच पति प्राप्त होतो, अशीहि या व्रताची फलश्रुति सांगितलेली आहे. तेव्हां अर्थातच आमच्या अज्ञान व देवभोळ्या स्त्रियांच्या मनावर या व्रताचरणाचें महात्म्य कांहीं विशेष आहे. वस्तुतः अशी फलश्रुति बोलून चालूनच रोचनार्थ—ह्मणजे असल्या व्रतांची लोकांना गोडी लागावी ह्मणून—सांगितलेली असते; तेव्हां या फलश्रुतीप्रमाणें लोकांत अनुभव मात्र दृष्टीस पडतोच असें नाहीं. व्रतें, उपवास, चातुर्मास्यांतील नेमधर्म वगैरे जीं अनेक काम्यकर्मे आहेत तीं लोकांच्या मागें लावून देण्याचा उद्देश इतकाच आहे कीं, व्यवहार मार्गानें आपण चाललों असतांहि वरचेवर ईश्वर भक्तीचें आपणास स्मरण राहावें; व इहजन्मीं येऊन केवळ आपणास कुटुंबभरणच करावयाचें नाहीं, तर दया दान धर्मादिकांकडे लक्ष्य ठेवून यथाशक्ति त्यांच्या आचरणानें आपणास परमार्थ सुलभ करून घ्यावा. श्रीमद्भागवतांत सांगितलें आहे कीं—

दान व्रत तपो होमो जपस्वाध्याय संयमैः।
श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः कृष्णे भक्तिर्हिसाध्यते ॥

ह्मणजे-दान, व्रत, तप, होम, जप, वेदाध्ययन, इंद्रियनिग्रह वगैरे अनेक प्रकारचे जे कल्याणकारक मार्ग आहेत त्यांचें मुख्य फल ईश्वराच्या ठायीं भक्ति होणें हेंच आहे.

कोणत्याहि व्रतादिकांच्या आचरणाचा हा मूळ उद्देश लोक क्वचितच लक्ष्यांत आणतात. आणि येऊन जाऊन सर्व कांहीं निरर्थक भर त्या व्रतांत सांगितलेल्या बाह्य खटपटींवर येऊन पडते. परंतु मूळ उद्देशाचें विस्मरण किंवा अज्ञान ठेवून नुसती ही बाह्य खटपट अगदीं व्यर्थ आहे. वरतीं सांगितल्याप्रमाणें व्रताचरणाचें जें मुख्य फल ईश्वर भक्ति प्राप्त होणें तें या खटपटीनें बिलकुल साध्य होत नाहीं. व्यर्थ कर्मठपणा मात्र वाढून परमार्थमार्गास विघातक असा पोकळ कर्तृत्वाभिमान आंगीं राहतो. यांत कल्याण नाहीं. किंवा साध्य करून घ्यावयाचें तेंहि हें नाहीं. ईश्वराची भक्ति अंतःकरणांत उत्पन्न होण्याकरितां चित्त निर्मल पाहिजे आहे, आणि चित्ताची निर्मलता व शुद्धि होण्याकरितां जीं साधनें आहेत त्यांपैकींच व्रतोपवास हेंहि एक आहे.

धर्मसंबंधीं एकेक जे उन्नत विचार आमच्याकडे होत गेले त्यांच्या दृष्टीनें कर्मकांडाची खटपट हीच मुळीं गौण मानली गेली आहे; त्यांत काम्यकर्में तर अधिकच गौण होत; तेव्हां तीं जर उद्देश विसरून जाऊन किंवा उद्देशाचें अज्ञान राहून कांहीं तरी रूपानें आह्मीं करूं, तर मग तीं किती गौण ह्मटलीं पाहिजेत?



अज्ञ स्थितींत असलेल्या सामान्य जनांसाठीं असल्या कर्मांचें प्रयोजन असतें हें खरें; पण तींच कांहीं सिद्ध नाहींत, तर एक प्रकारचीं साधनें आहेत. हें न विसरतां सिद्ध वस्तु साध्य करून घेण्यांत मात्र त्या साधनांचा संग्रह अवश्य आहे हें लक्ष्यांत असावें; आणि ह्या धोरणानें असल्या साधनांचा उपयोग करून घेतला जावा. लोकांस धर्म कर्मांचा उपदेश करून त्यांना सन्मार्गानें नेण्याचें कर्तव्य ज्यांचें आहे त्या हरदासवैदिक-पुराणिकांनीं ह्या व्रतादिकांचा असा उद्देश लोकांस वरचेवर जाणवीत गेलें पाहिजे. बाया बापड्यांना व्रतोपवासाचीं महात्म्यें तिखट मीठ लावून सांगण्यांत व कोणत्या तरी प्रकारें आपल्या प्राप्तीची भर करण्यांत जशी तत्परता राखली जाते, तशी जर या व्रतोपवासांचे उद्देश, ते साधून घेण्याचे मार्ग, वगैरे अवश्य गोष्टींचा बोध या मंडळीकडून स्त्रीजनांस होत जाईल, तर यांच्या पदरीं पडणाऱ्या प्राप्तीचें कोणास देखील वाईट वाटणार नाहीं.

केवळ रोचनार्थ ह्मणून या 'वटसावित्री' व्रताची जी फलश्रुती सांगितलेली आहे-ह्मणजे सौभाग्य रक्षण होणें व जन्मोजन्मीं हाच पति मिळणें ही—आतांच्या सुशिक्षित विचार सरणीस कितपत खरी वाटेल याचा संशयच आहे; पण एवढें मात्र निर्विवाद राहील कीं, प्रस्तुत व्रतविषय, जी सावित्री, तिचें चरित्र मननपूर्वक श्रवण केल्यानें, तिची पतिनिष्ठा, तिचें धैर्य, तिचा (एक प्रकारचा) दृढनिश्चय व यमधर्माशीं भाषण करतांना तिचें चातुर्य हे सर्व उन्नत गुण स्त्रियांना स्पृहणीय व अनुसरणीय

होतील यांत कांहीं संशय नाहीं. आम्ही तरी याच गुणांचा बोध स्त्रियांना होण्याकरितां हा एक अल्प यत्न केला आहे.

ही कथा महाभारतांत आहे त्याचप्रमाणें ती मत्स्यपुराणामध्येंहि आहे. आह्मी मुख्यतः मत्स्यपुराणांतलि कथानकाच्या आधारानेंच पण काव्यशोभनार्थ किंचित् फेरफार करून ह्या कविता रचल्या आहेत. त्यामुळें मुक्तेश्वर,मोरोपंत यांसारख्या कविनायकांच्या जरी ह्याच कथानकावर कविता आहेत,तरी त्यांच्या त्या कविता महाभारतांतील कथानकाच्या आधारानें असल्यामुळें त्यांहून आमच्या या अल्पकृतींत पुष्कळ वैचित्र्य आढळेल.

आह्मी हें 'सावित्री चरित्र' पुढें गद्य आणि पद्य अशा दोन्ही रूपांनीं दिलें आहे. त्याचा उद्देश असा कीं, गद्य जें आहे तें सरळ गोष्टीसारखें वाचतां यावें, आणि पद्य आहे तें पाठ करून सुस्वर ह्मणतां यावें. पद्यरचना 'साकी' वृत्तांत केली असल्यामुळें, स्त्रियांना त्यांच्या दोन तीन गाण्यांच्या चालीवर ती ह्मणण्यास उपयोगी पडेल.

कित्येक महाजनांनीं आपला बहुमोल वेळ खर्चून ह्या कवितेवर आपले अभिप्राय दिले आहेत. तशाच त्यांनीं कांहीं सूचनाहि केल्या आहेत. याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहों. त्यांच्या सूचनांचा विचार यावेळीं करून व त्याप्रमाणें फेरफार करून,ही या पुस्तकाची दुसरी आवृत्ति आह्मी वाचकांस सादर करीत आहों.पहिल्या आवृत्तीप्रमाणेंच ही देखील सर्वांच्या आदरास पात्र होवो अशी आशा दर्शवून हा प्रस्ताव पुरें करूं.

मुंबई, ता. २० आगष्ट सन १८९० ईसवी. } अनंत वामन बरवे.

# सावित्री चरित्र.

( गद्यरूपानें. )

'सावित्री' हें कांहीं स्वतंत्र कथानक नाहीं; तर महाभारतांतील अनेक कथांच्या आंगभूत हें एक उपाख्यान आहे. 'नलदमयंती,' 'हरिश्चंद्र कथा,' 'दुष्यंत शकुंतला,' 'ययाती आख्यान' इत्यादि कथानकें देखील उपाख्यानेंच होत. पांडव आपल्या पत्नीसहवर्तमान बारा वर्षें वनवासामध्यें असतांना ज्या ज्या विद्वान ऋषींचा त्यांना समागम होई, त्यांच्यापासून विश्रांतीचे वेळीं सुबोधपर कर्मणूक होण्यासाठीं प्रसंगानुरोधानें कित्येक कथा ते श्रवण करीत असत. त्याच या बहुतेक सर्व कथा होत. ह्या मनोरंजक आहेत, त्याचप्रमाणें अत्यंत बोधपरहि आहेत. प्रस्तुतचें हें 'सावित्री कथानक' तरी त्यांपैकींच होय. हें लोमेषऋषींनीं पांडवांस सांगितलें आहे. याचा प्रसंग असा—

वनवासामध्यें असतांना एकदां धर्मराज आपले चौघे बंधु व साध्वी द्रौपदी यांजसहवर्तमान स्वस्थ अंतःकरणानें बसले असतां लोमेषऋषीस त्यांनीं प्रश्न केला कीं, "महाराज, आज आह्मांला कोणा तरी एका पुराणप्रसिद्ध महासाध्वीचें चरित्र सांगा. तें अगदीं साद्यंत सांगा—ह्मणजे तिचा वंश, तिचा देश, तिचा पति यांचीहि साग्र माहिती सांगा—कारण तिच्या थोर पातिव्रत्यानें या सर्वांस पवित्रपणा आला असल्या कारणानें त्यांचाहि नामनिर्देश शुभदायकच आहे. अशा साध्वी स्त्रीचें चरित्र ऐक-

ण्याची आज आह्माला फार उत्कंठा आहे. ती आमची आपण पूर्ण करावी. होऊन गेलेल्या थोरामोठ्यांचीं चरित्रें ऐकिलीं असतां तीं आह्मासारख्या वर्तमानकालीन मनुष्यांना अनुकरणीय होतात; ते कोणत्या वेळेस कसे वागले, त्याचा परिणाम काय झाला, यांचे अनुभव आह्मास पाहावयास सांपडून आह्मास आपलें संसारमार्गक्रमण सुखावह होईल, अशा रीतीनें चालण्यास सुलभ होतें. शिवाय हें साध्वी स्त्रीचें चरित्र असल्यामुळें एथें ही **द्रौपदी** ऐकावयास बसली आहे तिलाहि त्यांत घेण्यासारखा बहुतेक बराच भाग आढळेल. या करितां एवढी आमची इच्छा आज आपण तृप्त करावी अशी आमची आपणास विनयपूर्वक प्रार्थना आहे." येणेंप्रमाणें धर्मराजाचें भाषण ऐकल्यानंतर **लोमेष** ऋषींनीं सावित्री कथानक सांगण्यास सुरुवात केली. हें कथानक रमणीय आहे व बोधपर असल्यामुळें विशेषत: स्त्रियांना चांगलें अनुकरणीय आहे. तें कथानक असें—

पूर्वी **मद्रदेशांत अश्वपति** नामक कोणी एक न्यायशील राजा होता. त्याच्या **पत्नीचें** नांव मालती. अश्वपति राजास संतति नसल्यामुळें तत्प्रीत्यर्थ त्यानें '**सावित्री**' नामक एका देवीची दहा महिने आराधना करून तिला सुप्रसन्न करून घेतलें; आणि पुत्र तर नाहींच, पण उभय कुलांचा उद्धार करणारी अशी रूपगुणसंपन्न एक कन्या होईल, असा आशिर्वाद देवीजवळून मिळविला. त्या आशिर्वादाप्रमाणें पुढें त्याची भार्या, **मालती**, हिला गर्भ राहून नऊ मास पूर्ण होतांच देवीनें वर दिल्याप्रमाणें एक उत्कृष्ट **कन्यारत्न** झालें.



देवीचा प्रसाद ह्मणून त्या कन्येचें नांव **अश्वपतीनें 'सावित्री'** हेंच ठेवलें. ही कन्या दिवसांमासांनीं वाढून पुढें उपवर झाल्यावर तिच्या विवाहाविषयीं राजानें आपल्या मंत्रीमंडळास सल्ला विचारतां, त्यांनीं ह्या कन्येची रूपगुणसंपन्नता अतिशय पाहून ही **स्वयंवर** करण्यासच योग्य आहे असें सांगितलें. तेव्हां राजानें मंत्री, वृद्ध पुरोहित आणि सैन्य बरोबर देऊन कन्येस आपल्या मनाजोगा पति पाहून येण्यास आज्ञा केली.

**पति** पाहण्या करितां सावित्री देशोदेशीं हिंडतां हिंडतां एका रम्य वनांत आपल्या बरोबरीच्या लोकांसह ती येऊन उतरली. तेथें एके दिवशीं आपल्या सखीला बरोबर घेऊन **सावित्री** वनशोभा पाहत जवळच असलेल्या एका सरोवराचे कांठीं आली. तों वेषानें ऋषिपुत्रसम पण रूपतेजानें क्षत्रिय असा कोणी एक कुमार स्नानाकरितां तेथें येतांना तिला आढळला. त्यास पाहतांच **सावित्री** मोहित होऊन हाच आपणास पति योग्य आहे असें तिच्या मनानें घेतलें. व आपल्या सखीकडून त्याचें सर्व वृत्त श्रवण करून, तें ऐकल्यावर त्याशींच विवाह करण्याचा निश्चय ठरवून ती सैन्यसचिवांसह आपल्या नगरास परत गेली.

पुढें एके दिवशीं **पति** पाहण्यास निघाल्याची सर्व हकीकत **सावित्री अश्वपतीस** सांगत असतां त्या ठिकाणीं **नारदमुनींची** स्वारी आली. त्यांचें स्वागत झाल्यावर **अश्वपतीनें** प्रार्थना करून त्यास संमति विचारली कीं, ही माझी एकुलती एक कन्या, **सावित्री**, नुकतीच प्रवासाहून पतिनिश्चय करून आली आहे. हिनें **द्युमत्सेन** ह्मणून कोणी राज्यप-

द्युमत्सेन व अंध असा राजा आपल्या स्त्रीसह तपोवृत्तीनें एके वनांत राहात आहे, त्याचा पुत्र सत्यवान याशीं विवाह करण्याचा निश्चय केला आहे. आपण त्रिकालज्ञ आहां तेव्हां हा शरीरसंबंध आपल्या विचारास कसा काय येतो हें कळविण्याची कृपा व्हावी. अश्वपतीची ही विज्ञप्ति ऐकून नारदानीं क्षणभर अंतर्दृष्टि लाविली; आणि नंतर भाषण करण्यास प्रारंभ केला. ते ह्मणाले कीं, स्त्रियांना विधिपूर्वक पतिलाभ हा एकवारच होत असतो. याकरितां त्यांचें परिणयन करतांना वरपक्षा कडील कुलशीलवयोवृत्ति वगैरेबद्दल नीट परीक्षण करून मग विवाह नातें जोडावें. राजा, हल्लीं तुझ्या या मुलीनें जो पतिनिश्चय केला आहे तो तुमच्या योग्यतेला फारच कमी आहे. याकरितां मला वाटतें कीं, तूं त्याचप्रमाणें तुझ्या या मुलीनेंहि हा विचार सोडून द्यावा हें बरें."

नारदमहामुनीचें हें भाषण ऐकून सावित्री फार नम्रपणानें ह्मणाली कीं, "महाराज, आपलें वचन योग्यच आहे. व त्यांतून वडील माणसें सांगतील तें निमूटपणें ऐकण्याचेंच नातें मजकडे आहे; तरी प्रेमाची गांठ एकदां पडली कीं ती मग कशानेंहि सुटत नाहीं, याला काय करावें?" यावर नारदानीं तिला एकीकडे नेऊन सांगितलें कीं, "मुली, तूं ह्मणतेस तशी प्रेमाची गोष्ट आहे खरी; पण एखाद्या अयोग्य ठिकाणीं प्रेम ठेवून पुढें दुःखाची जोड करून कां ठेवतेस बरें? तूं जो पति पाहून आली आहेस तो नुसता यशैश्वर्यविहीन आहे ह्मणून त्याशीं मी संबंध नको असें ह्मणत नाहीं.



यश व ऐश्वर्य हीं केव्हांहि उद्योगानें प्राप्त करून घेतां येतील; पण तो सत्यवान् अल्पायुषी असल्यामुळें लौकरच मृत्युमुखीं पडणार आहे. तेव्हां अशाचे पदरीं पडून व्यर्थ सौभाग्यहानि कां करून घेतेस?"

नारदाचें हें भाषण ऐकून मात्र सावित्रीच्या पोटांत धस्स झालें. शांत वनांत राहून पतिसमागमें सासुसासऱ्याची सेवा करीत सुखानें आयुष्य घालविण्याचा जो तिचा मनोरथ तो एकदम नष्ट झाला; तरी थोर पुरुषांप्रमाणें तिणें विचार करून आपला दृढनिश्चय नारदमहामुनीस ती येणेंप्रमाणें सांगूं लागली. ती ह्मणाली, मनुष्याचे प्रत्यक्ष देहव्यापार घडण्यास ज्या अर्थी मन हेंच मूळ कारण आहे, त्या अर्थी मनानें जी एकदां गोष्ट ग्रहण केली, ती देहानेंहि ग्रहण केल्याप्रमाणेंच आहे. तेव्हां सत्यवानास ज्यापक्षीं मी मनानें पतिभावानेंच घेतलें आहे, त्यापक्षीं आतां तो अल्पायुषी असो किंवा कसाहि असो, तो मला सोडतां येत नाहीं. त्याच्या ठिकाणीं माझी पतिनिष्ठा आतां कायम झाली आहे.

सावित्रीची ही सत्यनिष्ठा पाहून नारदमहामुनीला परम संतोष वाटला. व तिला 'सौभाग्यश्रीवर्धक' असा आशिर्वाद देऊन ते निघून गेले. पुढें सुमुहूर्तावर 'सावित्रीसत्यवानाचा' त्या वनांतच विवाह झाला. विवाहानंतर सावित्री आपलें राज्यवैभव सोडून पतीबरोबर सासुसासऱ्यांची सेवा करीत त्या वन्य स्थितींत जाऊन सुखसमाधानानें तेथें राहिली.

एके दिवशीं आपल्या पतिनिधनाचा जो काळ नारदमुनीनीं

सांगितला होता त्याचें तिला सहज स्मरण झालें व तो अगदींच नजीक येऊन ठेपलासा पाहून तर तिचें चित्त फारच घाबरलें. तिला कामधंदा सुचेनासा झाला, नेहमीं घरांत वागतांना तिची जी उल्हासवृत्ति असे ती जाऊन ती उदास झाली, व एखादा महा सर्प जसा पुरलेल्या द्रव्यावर संरक्षणार्थ टपून बसलेला असतो. तशी ती पतीच्या जीवितधनाच्या रक्षणार्थ ह्मणून निरंतर त्याच्या निकट राहूं लागली. त्यास आपल्या दृष्टीपुढून क्षणभरहि एकीकडे होऊं देईना. शेवटीं 'ज्येष्ठशुद्ध पौर्णिमेच्या' दिवशीं सायंकाळीं नित्याप्रमाणें समिधापुष्पें वगैरे आणण्यास सत्यवान निघाला असतां सावित्रीही सासुसासऱ्याची आज्ञा घेऊन त्याजबरोबर गेली. वाटेनें तिची उदासीनता जाऊन तिनें प्रसन्नचित्त व्हावें ह्मणून भोंवतालची मनोहर वनशोभा दाखवून व प्रेमळ गोष्टी बोलून सत्यवानानें आपली पराकाष्ठा केली; पण व्यर्थ. उलटें असा आपणावर अकृत्रिम प्रेम करणारा पति आतां लौकरच आपणास अंतरणार हेंच मनांत येऊन तिला अधिकाधिक दुःखाचे उमाळे फुटूं लागले. सायंकाळचे सुमारास एका वटवृक्षावर चढून सत्यवान समिधा तोडीत असतां व त्याजवर दृष्टि लावून साचिंत मुद्रेनें खालीं त्याची पत्नी सावित्री बसली असतां, त्यास आपल्या मस्तकांत शूल उठल्याची भावना झाली. ह्मणून तो खालीं उतरून विश्रांतीसाठीं सावित्रीचे मांडीवर मस्तक ठेवतो आहे, इतक्यांत त्यास मूर्च्छा आली व लगेंच त्याचें प्राणोत्क्रमणहि झालें! त्यावेळीं सावित्रीची



अवस्था काय विचारावयाची आहे. तिनें अतिशय शोक केला; व आपल्या दीन स्वरानें भोंवतालच्या वृक्षपाषाणासही करुणा आणली! परंतु उपयोग काय! शेवटीं आपल्या पतीचे प्राण हरण करून यमराजाची स्वारी दक्षिण दिशेनें चालली आहे असें पाहून ती त्यांच्या मागोमाग पतिप्राणासमागमें जाण्यास निघाली. जातां जातां मार्गांत तिचें व यमाचें संभाषण झालें; त्यांत तिची पतिनिष्ठा, न्यायप्रचुरभाषण, चतुरता इत्यादि गुणांनीं यमराज संतुष्ट झाले व तिच्या सासुसासऱ्यांस दृष्टि व राज्य दिलें, मातापितरांस पुत्रसंतान दिलें आणि तिला तिचा प्रियपति देऊन परत लावलें. तें भाषण येणेंप्रमाणें.—

( **यमाचे** मागून बराच वेळ चालल्यावर )

**सावित्री.**—महाराज, ही कन्या परम नम्रतेनें आपणास एक प्रार्थना करीत आहे, तिकडे आपण क्षणभर लक्ष्य द्यावें. सुज्ञ पुरुषांच्या मुखानें मीं असें ऐकिलें आहे कीं, आपल्या आईची सेवा उत्तम प्रकारें करणारास ह्या कर्मभूमीमध्यें उत्कृष्ट मनुष्य जन्म प्राप्त होतो; बापाची सेवा करणारास चिरकाल स्वर्गसौख्य प्राप्त होतें; आणि आपल्या गुरूची सेवा करणारास ब्रह्मलोकाची प्राप्ति होते. ह्मणजे आई बाप आणि गुरु या त्रिवर्गांची सेवा केल्यानें मनुष्यास संपूर्ण धर्माचरणाचें फल एकदम प्राप्त होतें. माझा पति हें अनुशासन लक्षांत ठेवून त्याप्रमाणें आपल्या आईबापाची सेवा त्यांच्या विपत्प्रसंगीं अनन्यभावें करीत असतां आपण त्यास घेऊन चाललां आहां हें कसें बरें? तिकडे आईबाप अंध आहेत, निराश्रित आहेत, त्यांचा हा म-

हान् मातृपितृभक्त एकुलता एक पुत्र आपण नेल्यानें त्यांची तिकडे काय दशा व्हावी बरें?

यम.—(तिच्या न्यायप्रचुर भाषणानें आनंदित होऊन)—खरें आहे मुली; तूं ह्मणतेस तें खरें आहे. आईबाप आणि गुरु यांची सेवा करणें, त्यांना दुःख न देणें, त्यांची अवज्ञा न करणें हीं परमश्रेष्ठ भक्ति होय. हिच्या योगानें मनुष्यास इहपरलोकीं सौख्याचा लाभ होऊन अंतीं मोक्षहि मिळतो. तुझ्या या पतीनें आपल्या मातापित्याची सेवा या अल्पवयांतहि उत्कृष्ट प्रकारें केली आहे, तेव्हां तो आतां स्वर्ग सौख्य भोगून शेवटीं ब्रह्मलोकासच जाणार आहे. तूं देखील आपल्या धर्माचरणानें पुढें त्यास जाऊन मिळशील. आतां तुझ्या पतीचे आईबाप वृद्ध, अंध व निराश्रित आहेत असें ह्मणतेस, तर हा घे वर; मी तुला प्रसन्न होऊन वर देतों कीं, त्यांना त्यांचें नष्ट झालेलें राज्य पुनः मिळेल व त्यांचें अंधत्वहि तुझा त्यांच्या नेत्रास हस्तस्पर्श होतांच दूर होईल. ऐकलेंस? जा, तूं आतां परत कशी. उगीच माझ्यामागें येण्याचे श्रम कशाला घतेस बरें?

सावित्री.—होय, आपली आज्ञा मला शिरसामान्यच केली पाहिजे; पण माझी आतां स्थिति काय व्हावी हें आपण पाहिलें नाहीं. मी आपल्या आईबापास एकटीच आहें आणि तीहि कन्याच आहें. त्यांतहि आतां तर ही विधवा कन्या आहें. मोठे नवससायास करून जी मी त्यांना प्राप्त झालें ती आतां अशा स्थितींत पाहून त्यांना केवढें मरणप्राय दुःख वाटेल बरें! सासुसासऱ्यांनाहि मी ही ऋणाइत सून काय उपयोगीं येणार आहे!



माझ्या हातून आजपर्यंत आपल्या पतीची सेवा देखील पुरतेपणीं घडली नाहीं; तेव्हां आतां त्याच्या मागून अशा येण्यानें तरी या माझ्या देहाचें कांहीं सार्थक होवो असें वाटतें. माझ्यात्यानें पतीस अनुलक्षून आपल्या मागें येववेल तेथपर्यंत मी येईन; पुढें येणें अशक्य वाटलें ह्मणजे अर्थातच या देहाचें विसर्जन करावें लागणार आहे!

यम.—(तिच्या या दृढ निश्चयानें विस्मित होऊन)—मुली, तुझ्या आईबापास शंभर पुत्र होतील असा मी तुला आणखी हि एक वर देतों. जा, आतां तूं परत जा. उगीच कष्टी होऊं नकोस. हा मार्ग फार कठीण आहे.

सावित्री.—महाराज, मला तरी मागें जाऊन आतां कर्तव्य काय राहिलें आहे बरें! आपण हे जे दोन आशिर्वाद दिले एवढ्यानें माझ्या उभयकुलांचें कल्याण झालें. पण पतिव्रता स्त्रीस योग्य असें स्वतः मजकडून आचरण झाल्याशिवाय या माझ्या स्त्रीजन्माचें सार्थक कसें होईल? पतीची सेवा करणें, त्याला देवाप्रमाणें पूज्य मानणें, त्याच्या वित्तजीविताचें संरक्षण करणें, धर्मकर्मामध्यें त्यांशीं अनुकूल राहणें, संपत्कालीं त्यास हर्षविणें, विपत्कालीं त्यास धैर्य देणें, घरांत नेहमीं प्रसन्नमुखानें राहून त्याची मानसचिंता नाहींशी करणें इत्यादि प्रकार स्त्रियांच्या पातिव्रत्य धर्मांत येतात. जी या धर्मानें वागते तीच स्त्री धन्य होय. मला आतां हें धर्माचरण अंतरलें, तेव्हां मागें परत जाऊन काय करावयाचें आहे! अहो, ज्याप्रमाणें लतेला वृक्ष त्याचप्रमाणें पतिव्रता स्त्रीला तिचा पति हा आधार आहे. तो

आधार तुटला ह्मणजे उभयतांचीहि गति एकच. नित्य नवे वस्त्रालंकार लेवून ज्याच्या जीवावर हें शरीर मिरवलें त्याच्यामागें आतां विधवा या अक्षरांनीं दूषित होऊन तें कसें वांचावें याचा आपणच विचार करावा. आपण धर्मराज आहां व मी आपली धर्माची कन्या आहें. या आतां दुःख स्थितींतून आपणच कृपाकरून कोणत्या तरी प्रकारें माझी मुक्तता करावी. माझ्यानें जास्त विनंति करवत नाहीं. या करितां हें मस्तक आतां आपल्या चरणावर ठेवलें आहे, यांतच बाकीचें सर्व समजून घ्यावें-

( असें ह्मणून सावित्रीनें यमाच्या पायांवर मस्तक ठेवलें. )

**यम.**-(गहिंवरून)- ऊठ ऊठ मुली; शोक पुरें कर. जा, तुझ्या पतीस मी प्राणदान दिलें. आतां तुह्मी उभयतां शतवर्षेंपर्यंत आनंदानें संसार करून पुत्रपौत्रवान व्हा; सद्धर्मानें वागा; कीर्तिं संपादन करा आणि यथाकालीं स्वर्ग सौख्य भोगण्यास उभयतां बरोबर या.

असा आशिर्वाद देऊन **यमधर्म** तेथेंच अंतर्धान पावले. नंतर **सावित्री** पतीच्या प्रेताजवळ येऊन त्यास स्पर्श करतांच तो सजीव होऊन उठला. नंतर तिनें घडलेला सर्व वृत्तांत त्यास सांगून मग तीं दोघें परत आश्रमाकडे जाण्यास निघालीं. पुढें **यमानें** दिलेले सर्व आशिर्वाद फलद्रूप झाले- ह्मणजे **सत्यवंताचे** मातापितरांस दृष्टि आली, त्याचें नष्ट झालेलें राज्य त्यास मिळालें, व सावित्रीच्या बापास (**अश्वपती** राजास) शंभर पुत्र झाले. **लोमेषऋषी** ह्मणाले, धर्मराजा, याप्रमाणें हें चरित्र आहे. तें मी तुला यथामति निवेदन केलें.



**सारांशः**-सद्गुण, सद्वर्तन, पत्यैकभाव, निर्मलवृत्ति, इत्यादि गुणांनीं युक्त **सावित्री** असल्यामुळें तिनें आपली कीर्ति या जगांत अमर करून ठेवली आहे, तिचें चरित्र सर्व स्त्रिया मोठ्या पूज्य बुद्धीनें गातात, आणि तिच्या सदाचरणाचें जणूं काय स्मारकच ह्मणून '**वटसावित्री**' या नांवानें प्रतिवर्षीं '**ज्येष्ठशुद्ध पौर्णिमेस**' आपल्यांतील सर्व **सुवासिनी** स्त्रिया व्रत करीत असतात. या व्रताचरणानें व्रतविषय जी **सावित्री** तिचे संपूर्ण सद्गुण आमच्या स्त्रीवर्गाचे ठायीं उतरून तिजप्रमाणेंच आपली जगांत सत्कीर्ति करून ठेवण्याची त्यांना बुद्धि होत जावो.



# सावित्री चरित्र.

## अध्याय—पहिला.

(साकीवृत्त.)

आदौं वंदन गजाननातें पावो विघ्न हराया ॥
पश्चात् देवी सरस्वतीतें बुद्धिदायिनी व्हाया ॥ १ ॥
कैलासाचलशिखरावरि करि लीला गिरिजासंगें ॥
त्या श्रीशंकरचरणावरि हा नमस्कार साष्टांगें ॥ २ ॥
वंदन नंदनें-धर्मोचित हें जननी-जनक-पदांतें ॥
न पारितोषकें परितोषक हो त्यांच्या श्रान्त मनांतें ॥ ३ ॥
श्रीगुरुवरपदकमल आठवो तदुपदेशें ही मंजला ॥
मंगल पायावरी चढो या कथारूप हा मजला ॥ ४ ॥
शिष्ट जनांचा संप्रदाय हा मीं अनुसरून यातें ॥
चरित्रकथनापूर्वी केलें सुमंगलाचरणातें ॥ ५ ॥

लोमशेषोतें विपिनीं असतां धर्म विचारी चरितें ॥
मनोरंजकहि असून नामी धर्मनीतिरसभरितें ॥ ६ ॥
" होती पूर्वी कोण सुव्रता त्रिजगातें नमनीय ॥
संभवूनें ती वंश कोणता धन्य करी कमनीय ॥ ७ ॥

१ प्रारंभीं. २ तदनंतर. ३ बुद्धि देणारी. ४ पुत्रधर्माप्रमाणें ५ बक्षिस ६ मजसाठीं जे श्रम त्यांना पडले त्यायोगानें शिणलेल्या त्यांच्या मनास ७ त्यांचा उपदेश. ८ मंगलकारक ९ इमारत. १० उत्तम चाल. ११ एका ऋषीचें नांव १२ वनवासांत असतांना. १३ चांगलीं. १४ धर्म आणि नीति यांहीं परिपूरित. १५ जिचें उत्तम आचरण आहे अशी १६ वंदन करण्यास योग्य. १७ जन्म घेऊन. १८ सुंदर.



झालें कोठें पवित्र भूतल हें तत्पोदस्पर्शे ॥
कोण तिचा पति न ज्याप्रति प्रतिकूल हि ती आमर्षे ॥ ८ ॥
सांगा व्हाया साध्विचरित्रश्रवणेच्छापरिपूर्ति ॥
द्रौपदीस ही ऐकतांच हो अनुकरणेच्छास्फूर्ति ॥ ९ ॥
थोरांचीं जीं सच्चरितें तीं लोकांतें अनुकार्य ॥
त्यांविण संसृतिजन्य संकटें असतात अपरिहार्य" ॥ १० ॥
मुनिवर बोले, "ऐक सांगतों कथा परम रमणीय ॥
स्त्रीवर्गातें सद्बोधावह तशीच अनुकरणीय ॥ ११ ॥

शाकलगोत्रीं मद्रदेशपति नृपति एक कीं झाला ॥
राजधर्मनयनीतिनिपुणसा नाम अश्वपति त्याला ॥ १२ ॥
भार्या त्याची मालति नामें होती सद्गुणशाली ॥
पतीस सहचारि असे प्रजेतें मातेपरि परिपाली ॥ १३ ॥
सदां उभयतां भयतापातें प्रजाजनांच्या हरिती ॥
यथान्याय तें पालन त्यांचें करून त्या सुखवीती ॥ १४ ॥
नृपकर्तव्य प्रजापालनच तीस उपप्लव देई ॥
जो भूपति तो निजप्रजेचें शिरीं पाप-फल घेई ॥ १५ ॥
वित्तजीवित प्रजा भोगिती सदां शांत राहून ॥

१ तिच्या पावलाचे स्पर्शानें. २ क्रोधानें. ३ पवित्र स्त्रीचें चरित्र ऐकण्याची जी इच्छा ती पूर्ण होण्याकरितां. ४ त्याप्रमाणें आपणहि वागावें असा संकल्प मनांत येणें. ५कित्ता घेण्यास योग्य. ६संसारांत उत्पन्न होणारीं. ७ निवारण करण्यास कठीण. ९ शत्रुचोरादिकांचें भय व दारिद्र्यादि ताप. १० राजाचें कर्तव्य. ११ पीडा. १२ धन आणि आपले प्राण.

ज्या नृपसत्तेखालीं कां त्या रमाकांते उपमा न ॥ १६ ॥
असो, असें हें दंपत्य सुखें सुरेख नांदत असतां ॥
पुत्रावांचुनि जीवित विरडी त्यांची अंतःसमता ॥ १७ ॥
अतीच दुःसह निरपत्यत्व श्रीमंतांना असतें ॥
ऐश्वर्यातें भोगिति परि त्या समाधान सुख नसतें ॥ १८ ॥
निज पुत्राचें कौतुक अथवा तत्संगोपन जैसें ॥
खरेंच इतरां पितरां दुष्कर धनिकां होतें तैसें ॥ १९ ॥
नेणो प्रभुची अनवधानतां सृष्टिनियम किंवा हे ॥
निर्धनिका बहु संतति परि नच धनिक पुत्रमुख पाहे॥ २० ॥
प्रमाद ह्मणुं तरि कसा शोभतो जगत्साक्षि भगवंता ॥
सृष्टिनियम हा तरी न लागे कां सकला धनवंतां ॥ २१ ॥
ठेवा संचितें असे जसा तो दैव त्यापरी फळतें ॥
गमे सुयुक्तिक हें कीं, द्यावें तसेंच प्रतिफळ मिळतें ॥ २२ ॥

---

१ विष्णु ( 'नाऽविष्णुःपृथिवीपतिः' या वाक्याचा उपयोग अशा ठिकाणीं हा भाव ). २ मनाची स्वस्थता. ३ संतानरहित असणें. ४ न कळून चूक. ५ पुर्वजन्मीं केलेल्या बऱ्या वाईट कर्मांचीं फळें मनुष्यास ह्या जन्मीं भोगावीं लागतात, तेव्हां त्या पूर्वजन्मींच्या कर्मांस संचित ह्मणतात. त्या संचिताचा ठेवा जसा वाईट बरा असेल त्याप्रमाणें मनुष्य इहजन्मीं सुखी किंवा दुःखी असतो. आतां आपल्या वर्तमानकालीन सुखदुःखाची अशीच केवळ मीमांसा नाहीं मानली, तरी एवढी गोष्ट निर्विवाद असते कीं, आपल्याशीं प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध असलेल्या किंवा येणाऱ्या आपल्या किंवा इतरांच्या भूतकालीन बऱ्या वाईट कृत्यांशीं आपल्या वर्तमानकालच्या सुखदुःखाचा कार्यकारण संबंध असतो. पाहिजे तर हें भूतकालीन कृत्य देखील संचित ह्मणतां येईल.



करी अश्वपति नियमव्रत तो पुत्रार्थी होऊन ॥
येणें तरि जें संतति-घातक-संचित तें हो ऊनें ॥ २३ ॥
होतें सुंदर देवालय त्या मद्रपुरी बाहेर ॥
शांत असें तें एकांत स्थल तपस्व्यांस माहेर ॥ २४ ॥
श्रीसावीत्री नामें होती तेथें जागृत देवी ॥
तत्सेवा नृप करून भावें तपोवृत्ति निज ठेवी ॥ २५ ॥
आचरितां तप दश मासान्तीं प्रसन्न देवी झाली ॥
रत्नालंकृत सगुण स्वरूपें प्रकट होय त्या कालीं ॥ २६ ॥
" काय अभीप्सितें हेतु ! " वदे ती, " कष्टाहि कां शरिराला ॥
देशीं ? विदेशी बनून कां हें तपाचरण अनुसरला" ॥२७॥
विनम्रें वचनें वदे भूप तो बद्धांजुलि होऊन ॥
" हे अंबे तव कृपालोचनें कांहीं नाहीं न्यून ॥ २८ ॥
परी जननि जन निपुत्रिकेत्वें हा बहु कष्टी होई ॥
हो ईप्सितें तूं मातें वरदा वरदान तसें देई " ॥ २९ ॥
नृप-वचनातें ऐकुनि देवी बोले, "तुजला कन्या ॥
उद्धरील जी उभय कुलांतें होईल अशी धन्या " ॥ ३० ॥
वदूनि ती हें नृपति मस्तकीं वरद हस्त कीं ठेवी ॥
देउनियां वर हेत्वनुरूप स्वरूप झांकीं देवी ॥ ३१ ॥

---

१ संतति होण्यास प्रतिबंध करणारें. २ कमी. ३ स्थलाचें नांव ४ तापसी लोकांना. ५ नवसास हटकून पावणारी. ६ तापसी लोकाप्रमाणें आपलें आचरण. ७ दहा महिन्यांनंतर. ८ साकार रूपानें. ९ मनांतला. १० देतोस. ११ राज्य वगैरे टाकून देऊन देशत्याग केल्याप्रमाणें बनून. १२ मर्यादायुक्त. १३ हात जोडून. १४ कृपादृष्टीनें. १५ संतान नसल्यामुळें १६ इच्छेप्रमाणें. १७ वर देणारी १८ त्या माझ्या इच्छेप्रमाणें. १९ हेतूप्रमाणें.

सफलकाम तो भूपति झाला आला निज नगरातें ॥
आनंदानें वृत्त सकल तें सांगतसे स्वस्त्रीतें ॥ ३२ ॥
पुढें उभयतां कालक्रमणा करीत सौख्यें असतां ॥
भवाचित कळलें नृपास झाली गर्भवती निजकांता ॥ ३३ ॥
डोहोळे मग परोपरींचे तो भार्येचे पुरवी ॥
म्हणेल ती जें तें तत्प्रियें हि करून तदिच्छा पुरवी ॥ ३४ ॥
अंतर्वत्नी पत्नी असते जीवप्राण पतीतें ॥
त्याचीं प्रेमल नर्म भाषणें लज्जित करिती तीतें ॥ ३५ ॥
कला कला तो कलानिधीपरि परिपूर्णत्वा येतां ॥
गर्भ सतीचा प्रसूत होई नऊ मास ती होतां ॥ ३६ ॥
त्रिभुवनसुंदरि चिद्रत्नांचा अंश सगुण ती कन्या ॥
रूपगुणांची तिच्या कशी ती येईल सरी अन्या ॥ ३७ ॥
फलप्राप्त हें जिच्या कृपें त्या भगवति सावित्रीचें ॥
मंगलदायक सुभग नाम तें ठेवियलें पुत्रीचें ॥ ३८ ॥
अपत्यें आधीं प्रिय त्यांतुन वेहु वाटे लहान असतां ॥
त्याहुनि तें कीं वृद्धपणीं वा तदधिकें नवसें होतां ॥ ३९ ॥
वाढे कन्या दिनक्रमानें योग्य परिणयीं होतां ॥
अश्वपतीतें येऊन पडे मग तद्विवाह-चिंता ॥ ४० ॥

अध्याय पहिला समाप्त.

---

१ पूर्ण मनोरथ. २ तिला आवडतें तें. ३ गर्भवती. ४ विनोदकारक. ५ चंद्र ६ देवी सावित्रीचें विशेषण. ७ बरोबरी. ८ सौभाग्यकारक. ९ कन्येचें. १० पुत्र किंवा कन्या. ११ आवडतें. १२ अथवा. १३ त्याहून विशेष. १४ दिवसानुदिवस. १५ लग्नास. १६ विवाह करण्याची काळजी.



# अध्याय—दुसरा.

———:०:———

बघून उपवर सुता भूपवर मंत्रिजना पाचारी ॥
कराया वर निश्चय मग तो तदभिप्राय विचारी ॥ १ ॥
"या वरलब्धा कन्येतें वर सांगा कोण असावा ॥
तिलप्राय तो रूपगुणांहीं तीतें न्यून नसावा ॥ २ ॥
मंत्री वदती, "उचित असे ही कन्या स्वयंवरातें ॥
वरावयातें अयोग्य वाटे अन्यमनोनीतातें ॥ ३ ॥
कुलजा प्राज्ञा गुणसंपन्ना शीलवती सुविनिता ॥
कन्या सुस्थित अशी वाटते स्वयंवरातें उचिता ॥ ४ ॥
लोकोत्तर ही दुहिता विहिता भाग्यवंत पुरुषातें ॥
शिवा शिवातें अथवा जैसी कमला कमलाक्षातें ॥ ५ ॥
विचार हा निजमंत्रिजनांचा मानवला नृपतीला ॥
कन्यांतःपुरीं जाऊन तिला असें बोधितां झाला ॥ ६ ॥
" वयोवृद्ध तूं घेई पुरोहित सैन्य सचिव ही संगें ॥
मनासारखा पहावया वर जा परदेशीं आंगें ॥ ७ ॥

---

१त्यांचें मत. २ वरानें प्राप्त झालेल्या. ३ दुसऱ्यानें पाहून पसंत केलेल्यास. ४ शहाणी. ५ उत्तम स्वभावाची. ६ मर्यादशील. ७ योग्य ८ पार्वती. ९ लक्ष्मी. १० विष्णू.

कुलीन पाहीं मुली नोवरा सस्मित वदन असावा ॥
धर्मबुद्धि नयवृत्ति असून हि सद्गुणहीन नसावा ॥ ८ ॥
प्रकृति गुणचि जणु अबलांचा कीं, द्रव्य भूषणीं रमती ॥
नमति पतींतें सधन परी त्या निर्धनिका न वरमती ॥ ९ ॥
यास्तव तव मन करो न आशा केवळ हेमनगांची[1] ॥
लक्ष्मी चंचल जरि वैपुल्यें[2] करी सरी हि नगांची[3] ॥ १० ॥
जाणसि तूं हा उपदेश परी वदवी सुतवत्सलता ॥
कथितों ना तुज तरि मम हृदयीं वत्से फारच सलता" ॥ ११ ॥
मातापितरां नमून तद्वच ती शिरसां मानुनि घे ॥
आशिर्वचन स्वयें पतींतें शीघ्र बघायास निघे ॥ १२ ॥
वृद्धपुरोहितसचिवानुमतें देशोदेशीं फिरतां ॥
आली एका रम्य वनाप्रति पतिंवरा ती दुहिता ॥ १३ ॥
विविध तरूंचे संघें[5] तुंग बहु तेथ नभा आक्रमिती ॥
शिखरावरलीं पुष्पें त्यांच्या नक्षत्रांसम दिसतीं ॥ १४ ॥
कोठें कोठें वृक्षतळवटीं स्वच्छ झरे उदकाचे ॥
पाहूनच ते तृप्त होतसें श्रांत चित्त पथिकांचें ॥ १५ ॥
लतामंडप स्वयंभु झाले असति कुठें घन छाया ॥
छायानायक[6]किरण हि कोठें शक्त नसे शिरकाया ॥ १६ ॥
श्रांत मना सुखशांतिकारका सुमनोहर वनराजी[7] ॥

---

१ सुवर्ण भूषणें. २ पुष्कळपणानें. ३ पर्वत. ४ स्वतः पति पाहण्यास निघालेली. ५ जमाव. ६ सूर्याचे किरण. ७ वनपंक्ति.



राजीवाक्षा[1] प्रमुदित पाहुनि होई चित्तामाजीं ॥ १७ ॥
दिन कांहीं त्या स्थळीं करावा वास गमे त्या सतिला ॥
त्यास तिला ते रुकार देती सर्व करिति वसतीला ॥ १८ ॥
रम्य भूमि ती अवलोकाया कोण्या दिवशीं एका ॥
एकाकी सति निघे सखीसह शोभा बघे अनेका ॥ १९ ॥
शिखी नाचती कोकिल गाती मंजु गुंजती भृंग ॥
मौन कुरंगहि वरिती करिती अंतरंग हे दंग ॥ २० ॥
फिरतां फिरतां वनमध्यस्थित रम्य तडागीं येती ॥
आलि[2] नलिनीरज लुटती जेथें हंस मृणालीं[3] रमती ॥ २१ ॥
लतावृक्ष हीं युग्में[4] तेथें हंसक्रीडा बघुनी ॥
वाटे विकसित पुष्पमिसें जणुं हंसती आनंदोनी ॥ २२ ॥
वायु हालवी जेव्हां त्यांची नव कोमल पालविती ॥
भासे पथिका मौज पहाया तीं हर्ष पालविती ॥ २३ ॥
अशा तडागा समीप भागीं उभयजणीं संचार ॥
करितां त्यांतें येतां दिसला सुंदर एक कुमार ॥ २४ ॥
बकुलफलाकृति कमंडलू तो चिमणा घेउनि हातीं ॥
स्नान कराया होता तेथिल येत तडागावरतीं ॥ २५ ॥
सदन क्षत्रिय तेजाचें तो रूपानें जणुं मदन ॥
वदन विधूतें लाजवि तेंवी कुंद कळ्यातें रदन[6] ॥ २६ ॥
बघून त्यांतें ती सावित्री पूर्णमनोरथ होई ॥
पतिभावें मग त्या कुमरा प्रति तन्निर्मल मन घेई ॥ २७ ॥

---

१ कमलासारखे डोळे जिचे अशी (ती सावित्री). २ भुंगे. ३ कमलांचे देंठ. ४ जोडपीं. ५ बोलावतात. ६ दांत.

हर्षें झाली रोमांचित ती स्पृहायुक्त दृक्पातें ॥
बघतां गमले त्यावर ती स्वप्रेमवृष्टि कीं करिते ॥ २८ ॥
अशीं तिचीं हीं मुग्ध चेष्टितें सखी उमजली चित्तीं ॥
न पुसे, परि सावित्री सांगे जिची शुद्ध अति वृत्ति ॥ २९ ॥
"रूपवंत हा कुमार सखये चित्तीं माझ्या भरला[1] ॥
ज्या उद्देशें देश फिरावें तो आतां गे सरला ॥ ३० ॥
कोण कुणाचा कोठिल हा कीं वनवासी पुरवासी[2] ॥
येइं विचारुनि जाऊं नगरा कथूं वृत्त जनकासी" ॥ ३१ ॥
असें वचन ती ऐकून सखी कुमरासन्निध गेली ॥
नमून विनयें त्या तद्वृतश्रवणेच्छा श्रुत केली ॥ ३२ ॥
"या देहालासत्यवंत हें नाम" असें सांगे तो, ॥
"करून सेवा पितरांची मी सदा काल गे क्रमितों ॥ ३३ ॥
तो दिसतो बघ आश्रम आमुचा वृक्षसमूहाकीर्ण[3] ॥
तपोवृत्तिनें आपत्तीतें होत असों उत्तीर्ण[4]" ॥ ३४ ॥
सांगून असें वृत्त आपलें कुमार गेला स्थाना ॥
पूर्णहेतु या इकडे होउनि जाति आपल्या स्थाना ॥ ३५ ॥
गुरुजन होते संगें जे त्या वृत्त सर्व हें हें कथिलें ॥
सर्वांहीं मग मद्रपुरीतें जावेंसें अवेथीलें[5] ॥ ३६ ॥

---

१ अमुक एक गोष्ट आपल्या मनांत भरली आहे अशा दृष्टीनें. २ नगरांत राहणारा. ३ वृक्षांच्या समुदायानें आच्छादिलेला. ४आह्मावर तूर्त जो आपत्प्रसंग आलेला आहे तो आह्मी अशा तापस वेषानें वनांत राहून दवडीत आहों. सत्यवंताचे आईबाप राज्यपदच्युत झाले होते, हाच त्यांच्या वरील आपत्प्रसंग होय. ५ बेत केला.



शांत वनश्री वस्तुमात्र ही तेथिल सात्विकभावें ॥
वर्ततात हें बघून चित्तीं असें सतीच्या भावें ॥ ३७ ॥
सुवासिनी होऊन वसावें याच आश्रमामाजीं ॥
सेवा पतिसंगें उभयांची करुनि सासुमामाजी ॥ ३८ ॥

अध्याय दुसरा समाप्त.

---

१ या ठिकाणीं कोणाला कदाचित अशी शंका येईल कीं, सावित्री ही एका महान यशऐश्वर्यसंपन्न राजाची कन्या असतां तिला हा अरण्यवास पत्करावा असें कसें वाटलें. तर या शंकेचें समाधान असें आहे कीं, सावित्रीचे ठायीं सत्व गुणाचा अतिशय प्रेमा असल्यामुळें, त्या गुणास आवडते विषय ज्या ठिकाणीं विपुल दृष्टीस पडतात त्या ठिकाणीं तिची आवड सहजीं जडणार आहे. ती पुष्कळ देश फिरून आली होती, परंतु तिला समाधानकारक असें एकहि जनस्थान आढळलें नाहीं. आणि या वनांत जिकडे तिकडे शांतता, व वस्तुमात्राच्या ठिकाणीं सात्त्विक वृत्ति तिनें पाहिली, आणि तितक्यांत जो पुरुष आपल्या मनानें पति ह्मणून घेतला तोहि याच वनांतला राहणारा; याप्रमाणें सर्वच योग जमून आल्यामुळें तिनें आपल्या ठिकाणीं असा विचार केला कीं, आतां विवाहानंतर याच आश्रमांत पतिबरोबर सासुसासऱ्याची सेवा करीत आनंदानें स्वस्थ राहावें.

## अध्याय—तिसरा.

सावित्रीच्या महालांत नृप एके दिवशीं असतां ॥
निजकन्येचें प्रवासवृत्त श्रवण सकल तें करितां ॥ १ ॥
त्रिभुवनगामी महर्षि नारद येति अकल्पित तेथें ॥
हर्षित झालें चित्त नृपाचें बघून त्या मूर्तीतें ॥ २ ॥
देई आसन पूजी सारी यापरि तत्परिचर्या ॥
आदरपूर्वक वचनें मग तो संबोधी मुनिवर्या ॥ ३ ॥
" धन्य होय तें गृह कीं जेथें पुण्यवंतपद लागे ॥
तो गृहपतिही तैदर्चनीं जो अनन्यभावें भागे ॥ ४ ॥
सेवा तुह्मासम साधूंची गृहस्थाश्रमामाजीं ॥
नित्य घडो ही इच्छा न गणूं क्षीण या श्रमामाजीं ॥ ५ ॥
दिनचर्या या असो आश्रमीं ही, कीं सज्जनसंत ॥
संतर्पवें न घडो अल्पहि दीनांवनीं उँसंत ॥ ६ ॥
सद्दर्शन हें असे सुदर्शन मायापाशविनाशी ॥
आत्मज्ञानप्रकाश करवी हृदीं सुखवि उभयांसीं ॥ ७ ॥
सिद्धांच्या तो रूपें तुह्मा जगज्जाल जो रचितो ॥
स्वस्वरूपाचें स्मरण अह्मा या दर्शनलाभें देतो ॥ ८ ॥

१करी. २पूजा. ३त्याच्या आदरातिथ्यांत. ४गरीब लोकांचें सरक्षण करण्याचे कामीं. ५ विलंब. ६ आह्मा प्रपंचासक्त लोकांना तुह्मा सिद्ध पुरुषांच्या रूपानें तो परमेश्वरच आपल्या स्वरूपाचें स्मरण वरचेवर देतो. तुह्मा सिद्धासारख्या पुरुषांचें आह्मास वारंवार दर्शन न होतें तर आह्मास त्या अचिंत्य परमात्म्याच्या स्वरूपाविषयीं पूर्ण अज्ञान राहिलें असतें.



ह्मणून उत्कट आह्मा असते भवदागमनेच्छा ही ॥
युष्मद्दर्शन होय सुदिन तो त्यापरि पर्वणि नाहीं " ॥ ९ ॥
भाविक वाक्यें ऐकून अशीं तो मुनिपुंगव बोले ॥
" विनयपुरःसर या तव वचनें भूपा मन्मन धालें ॥ १० ॥
कशास व्हावें तें गृह किंवा नगर अगर तो देश ॥
लेश न जेथें धर्मबुद्धिचा साधु पावती क्लेश ॥ ११ ॥
वदान्यता ही आंगीं असणें असूनिया धनवंत ॥
जाणावें कीं पूर्वील संचित सत्तपफल बलवंत ॥ १२ ॥
धर्मनिष्ठ तूं न्याय्य आचरण ऐकून तुझें आलों ॥
आलोकूनहि आदर भूपा प्रसन्न तुजवर झालों ॥ १३ ॥
येरू वदे कीं, " भवत्कृपेनें वरापेक्ष मी नाहीं ॥
काय करावी जीवनदाशा सागरस्थ मीनांहीं ॥ १४ ॥
पातिव्रत्री ही कन्या व्हावी हाच मनोरथ उरला ॥
सरला ऐहिक आतां स्वमनीं आमुष्मिक मीं धरला ॥ १५ ॥
युष्मज्जननीप्रसाद हा ही गुणशाली मम कन्या ॥
भवदनुग्रहें मिळो हिला पति हो ही त्रिजगीं धन्या ॥ १६ ॥
द्युमत्सेन सुत सत्यवंत या नामें एक कुमार ॥
केला त्यातें वरावयाचा हिनें मनीं निर्धार ॥ १७ ॥
अंतर्ज्ञानें अवगत तुह्मा अखिल जगद्व्यापार ॥
सांगा त्याचें जातक व्हाया चिंतोदधि मी पार " ॥ १८ ॥

१ तुह्मी यावें ही इच्छा. २ उदारपणा. ३ पाहून. ४ मेघांची आशा. ५ माशांनीं. ६ लग्न झालेली. ७ पारलौकिक. ८ गुणकर्म.

क्षणेक करुनी नेत्रनिमीलन बोले मुनि नृपतीला ॥
" पतिलाभ असे मुख्य सतीला दैवत अन्य न तिजला ॥१९॥
पदरीं ज्याच्या बांधियली त्या सह कंठावा लागे ॥
जन्म मुलीला नियम असा हा पितरां ठावा लागे ॥ २० ॥
एकवार कीं विधिपूर्वक तें होतें कन्या दान ॥
ह्मणुनि करावा वाग्निश्चय जो उपजवि मग खेदा न ॥ २१ ॥
कुल—शीलहि—वय—वृत्ति—परिक्षण करुनी विवाह नातें ॥
जोडावें तें उभय कुटुंबा अतितर हितकर होतें ॥ २२ ॥
राज्यपदच्युत होउनि राहे द्युमत्सेन हा रानीं ॥
अंध स्त्रीसह, तो उपजीवन करी फलाहारांनीं ॥ २३ ॥
राजभोग ते अवगत नसती सत्यवंत कुमराला ॥
उद्यानांतिल पुष्पक्रीडा जेंवि वनभ्रमराला ॥ २४ ॥
लग्में जीं कीं संलग्न कुलें होतीं तीं अन्योन्य ॥
यशऐश्वर्ये समान व्हावीं परस्परातें मान्य ॥ २५ ॥
यास्तव योग्य न वाटे तुमचा हा संबंध मतीला ॥
ऐकुनि तूं दे मुली सोडुनी या प्रीतिग्रंथीला "॥ २६ ॥
यावरि बोलि उचित आदरें सावित्री मुनिवर्या ॥
" वर्या तुमचीं उक्ति; खरें तो योग्य न मम ऐश्वर्या ॥ २७ ॥
त्यांतुनियां जी वडिल माणसें आज्ञा करिती तनये ॥
नये अतिक्रम करूं तिचा परि मानावी ती विनयें ॥ २८ ॥
अविभाज्य परी प्रीतिग्रंथी शिथिलीकरण न सोपें ॥

१ डोळे मिटून. २ प्रीतीची गांठ. ३ मान्य. ४ तोडतां अगर सोडतां न येण्याजोगी. ५ सैल करणें.



होय तिचें ती अदह्येहि तशी गुरुकोपानलतापें" ॥ २९ ॥
आग्रह पाहुनि असा तिला तो एकांतीं मुनि सांगे ॥
"प्रेम ठेवुनी अयोग्य स्थळीं व्यसनीं पडशीं कां गे ॥ ३० ॥
तो ऐश्वर्यें विहीन नुसता कुमार तनये असता ॥
शरीरसंबंध हा तरी गे निवारिला मी नसता ॥ ३१ ॥
परिश्रमानें धनाढ्य होतो द्रव्यहीन ही नर कीं ॥
परि तो आयुर्विहीन जाईल झणिं कालाच्या नरकीं ॥ ३२ ॥
जेष्ट शुक्ल ती असे पौर्णिमा दिन त्याचे निधनाचा ॥
वरुनि अशा त्या नाश करिशि कां निज सौभाग्यधनाचा"॥ ३३ ॥
विद्ध होय या मुनिवचनांहीं कोमल हृदय सतीचें ॥
तिचें मनोरथ रूप नगरही झालें उध्वस्त साचें ॥ ३४ ॥
थोर जनांपरि परी विवेकें चित्त स्थीर करूनी ॥
निज संकल्पच सांगे मुनितें लव न निश्चया ढळुनी ॥ ३५ ॥
"देहकृत व्यापारा कारण ज्या अर्थी मन आहे ॥
त्या अर्थी जें मनें गृहितें तें देहें गृहितचि आहे ॥ ३६ ॥
ठेवी मन हें प्रेम ज्यावरी देहहि तेथें रमतो ॥
नमतो पूज्य मना जो त्यातें मनासवें तो भ्रमतो ॥ ३७ ॥
सत्यवंत तो कुमार माझ्या मनें निश्चयें वरला ॥
त्यजूं पतिच तो कसा, जरी ही काळव्यालें धरला ॥ ३८ ॥

१ आळतां न येण्याजोगी. २ वडिलांच्या कोपरूपी अग्नीनें. ३ दुःखांत. ४ मृत्यूचा. ५ देहानें केलेल्या. ६ स्वीकारलेलें. ७ मृत्युरूप सर्पानें.

पतिभावें जो मनें गृहित तो असो संकटग्रस्त ॥
त्रस्त श्रेष्ठ स्थानापासुनि तरि मन हो न त्रस्त " ॥ ३९ ॥
भाव मुलीचा शुद्ध बघुनि हा नारदमुनि वर देती ॥
तत्सौभाग्यश्रीवर्धक ते स्वस्थानाप्रति जाती ॥ ४० ॥

अध्याय तिसरा समाप्त.

---

# अध्याय—चवथा.

सत्यवंतसह सावित्रीच्या परिणयकालीं झाला ॥
सुबोधपर जो भाग श्रुत तो तुह्मा पाहिजे केला ॥ १ ॥
तो नृप तो जरि पिता वराचा विसरुनि ते निज नातें ॥
अन्योन्यातें आदरिती ही रीति योग्य सुजनांतें ॥ २ ॥
थोरांचीं कीं हृदयेंच अशीं त्यांसि न कोणी गर्ह्य ॥
स्थैर्य नगापरि मना विचारा सिंधूपरि गांभिर्य ॥ ३ ॥
प्रार्थी तो वाक्-निश्चयसमयीं अश्वपति व्याह्यातें ॥
" ठेव घालतों पदरीं घेउनि इतकें द्यावें ह्यातें ॥ ४ ॥
पालनपोषण करून आह्मीं वाढविली ही वेली ॥
तद्विस्ताराऽधारार्थ पुढें तुमच्या स्वाधिन केली ॥५ ॥
शिक्षणजल द्या प्रेमरसान्वित वळण तसें लावून ॥

१ खालीं पडलेला. २ त्रासलेलें. ३ अंतस्थ खरे विचार. ४ निंदा करण्या जोगा. ५ दृढपणा. ६ पर्वताप्रमाणें. ७ खोलपणा. ८ तिच्या पुढें विस्तार होणार त्याला आधारभूत होण्याकरितां.



पतिवृक्षावरि सहजची जावी ती पुढती लपटून ॥ ६ ॥
अन्योन्याश्रयवंत होउनी मग ते करितिल छाया ॥
जरारूप रवितापं आपणा पुढतीं सुखकर व्हाया ॥ ७ ॥
एकुलती ही कन्या आह्मा तीच असे आधार ॥
वाहवील हा विरह अखंडित नेत्राश्रूंची धार. " ॥ ८ ॥
यावरि बोले द्युमत्सेन, "मी अयोग्य या सन्माना ॥
पुरें कशाला हें विनयांचें भाषण आह्मा दीना ॥ ९ ॥
जडला कीं हा संबंध असो प्रेमल वर्तन आतां ॥
उभय कुटुंबें विषम परी या अनुग्रहें ये समता ॥ १० ॥
अप्रार्थित ही लक्ष्मी येते न ये हि जी नवसून ॥
उभय कुलांतें उद्धारो ही निजभाग्यें नवै सून ॥ ११ ॥
मानावी स्वस्नुषा सुतेपरि ती श्वश्रुश्वशुरांनीं ॥
वाटुं न द्यावें तिला सासरीं असतां पडल्यें रानीं ॥ १२ ॥
पोरबुद्धि ती क्षम्य सुनेची ह्मणून तत्प्रिय करणें ॥
प्रमाद होतां बोधावें परि रागें न तिला भरणें ॥ १३ ॥
सासुरवास प्रखर जाणविति सासरचीं तिस छळुनी ॥
आश्रुबिंदु मग सहज तिच्या मृदु गळती गालांवरुनी ॥ १४ ॥
देतां कन्या मानपुरस्कृत जोडूनी सम नातें ॥
तच्चिंता या शिरीं तुह्मी ती न वागवा स्वमनातें " ॥ १५ ॥
वदे अश्वपति, " शोभतसा ह्या सुविचारें विनयानें ॥

१ एकमेकांचा आश्रय धरून राहणारीं (अशीं तीं दोघें) २ आपला वृद्धपणा हाच सूर्य. ३ नवीन.

थोरांना परि हेंच भूषविति नित्य खरे दागिने " ॥ १६ ॥
विवाहसमयीं अंतःपट तो वधूवरांत धरीती ॥
सावधानतासूचक बोधक मंगलाष्टकें[1] ह्मणती ॥ १७ ॥
' सावधान– शुभमंगल ' ह्मणुनी शुभाक्षता नरनारी ॥
वधूवरावरि गमे टाकितां हिमकण वर्षे भारी ॥ १८ ॥
मुहूर्त घटिका भरतां घेतां अंतःपट काढूनी ॥
हार न तें स्वप्रेम अर्पिलें अन्योन्य वधुवरांनीं ॥ १९ ॥
वरप्रार्थना करी अश्वपति कन्यादानावसरीं ॥
" या कन्येतें आतां संसृति-मार्गीं धरावें स्वकरीं ॥ २० ॥
आजवरी मी इचें सुतापरि परिपालन कीं केलें ॥
सुखें दिन इच्या सहवासें मम वृद्धपणीं हो गेले ॥ २१ ॥

---

१ ऐका होउनि सावधान आजि या स्थित्यंतरा पावलां ॥
अन्योन्याश्रयवंत संसृति पथीं तुह्मी पहा जाहलां ॥
संसारश्रमभारवाहन असे कर्तव्य आतां पुढें ॥
धर्मन्याय सुशील वर्तन करा चित्तीं धरा एवढें ॥

---

संसारी बनलां तुह्मी वरवधु प्रेमें असा ह्यावरी ॥
अन्योन्या प्रियकाम मान सुख घ्या संसार घ्या हा शिरीं ॥
वर्धिष्णु स्वकुलीं मुली कुलिनता होईल वर्ते अशी ॥
पुत्रा नित्यहि सावधान असणें तूं वेळ येवो कशी ॥ २ ॥

---

त्यांपथ्यें इहलोकिं आचरुनियां सत्कर्म नांदा सुखें ॥
सावित्री विधि वा उभा पशुपती, मा विष्णु यांसारखें ॥
आयुष्मंत गुणाढ्य कीर्तिकर व्हा अर्थाप्ति तुह्मा घडो ॥
हें स्वस्त्यक्षर अक्षताहि शुभदा तुह्मावरी या पडो ॥ ३ ॥



गृहिणी स्त्रीचा देह पतीवरि अवलंबूनी असतो ॥
त्याविण धर्मार्थकामदाता अन्य तियेतें नसतो ॥ २२ ॥
यास्तव ईतें अर्थत्रय हें देउनि उभय –सहायें ॥
चतुर्थ अर्थ[1] प्राप्त करावा वर्तुनि धर्मन्यायें " ॥ २३ ॥
सत्यवंत यानंतर बोले, "न देइ अंतर हीतें ॥
ठेवितसें या वचना देवाग्निब्राह्मण साक्षीतें"[2] ॥ २४ ॥
पुढें अक्षतारोपणकालीं यश-प्रजा-धन-भाग्य- ॥
वृद्धि कराया परस्परांतें ह्मणती व्हावें योग्य ॥ २५ ॥
सूत्र वेष्टुनी कंकण बंधन करतां गमलें दोघा ॥
झालों आतां अन्योन्याश्रय तरावया भव ओघा[3] ॥ २६ ॥
मंत्र ह्मणुनि ' मांगल्य सूत्र० ' हा[4] बांधी मंगलसूत्र ॥

---

१ मोक्ष. २ लग्नाचे वेळीं मुलीच्या बापानें वर प्रार्थना करावयाचा मंत्र व त्याचा अर्थ ' विवाहविधि ' मध्यें आहे तो असाः–

" ममवंश कुलेजाता पालितावत्सराष्टकं ॥
तुभ्यंविप्र मयादत्ता पुत्रपौत्रप्रवर्धिनी ॥
धर्मे चार्थेच कामेच नातिचरितव्यात्वयेयं ॥ "

–ह्मणजे–ही माझी कन्या मी तुह्मास पुत्रपौत्र वृद्धीसाठीं दिली आहे, हिला धर्मार्थकामांत आपण अंतर देऊं नये. यावर वराचें उत्तर, " नातिचरामि "– अंतर देणार नाहीं—असें आहे. ३ संसाररूपी समुद्राचा ओघ. ४ हा संपूर्ण मंत्र व त्याचा अर्थ असा.

" मांगल्यतंतुनानेन भर्तृजीवन हेतुना ॥
कंठे बध्नामि सुभगे साजीव शरदांशतं ॥ "

—ह्मणजे—हे स्त्रिये माझ्या आयुष्यरक्षणास कारण असें हें मंगलसूत्र मी तुझ्या गळयांत बांधतों. मजसहित तूं शंभरवर्षे सुखानें वांच.

सावित्रीच्या कंठीं मग तो द्युमत्सेननृपपुत्र ॥ २७ ॥
अश्मारोहण लाजाहोम हि वधूवरें मग केलें ॥
विवाहमैत्री सुदृढ करायां सात पावलें गेले ॥ २८ ॥
कन्यापरिणय संपवुनी नृप निघे स्वदेशीं जाया ॥
सदय सुतेवरि व्हाया प्रार्थी विहीणिसि तज्जाया ॥ २९ ॥
"ध्या ही कन्या पदरीं उदरीं नऊ मास मीं धरिली ॥
वरिली पुत्रें तिला तुह्मी ध्या चिंता माझ्यावरली "॥ ३० ॥
मुख कुरवाळुनि सावित्रीतें उपदेशी नृपजाया ॥
पतिव्रतेचे तिजमध्यें गुणसद्धर्महि निपजाया ॥ ३१ ॥
"सासुसासऱ्याची शुश्रूषा यथायोग्य त्वां करणें ॥
गुरुजनकोपावसरीं तनये मौनव्रत आचरणें ॥ ३२ ॥
वडिलांसन्मुख उच्च आसनीं अपण गे न बसावें ॥
नयेच बोलूं मोठ्यानेंही तयापुढें न हंसावें ॥ ३३ ॥
नावडती जी गोष्ट सासरीं निषिद्ध वा मानीती ॥

---

१ अश्मारोहणाचे वेळचा मंत्र व त्याचा अर्थ असा.

इममश्मानमारोहा श्मेवत्वं स्थिराभव ॥
सहस्वपृतनायतोभितिष्ठपृतन्यतः "

–ह्मणजे–हे स्त्रिये या पाषाणावर चढ. व या पाषाणाप्रमाणेंच तूं स्थिर मनाची अशी हो. व आपलें सद्वर्तन ठेवून आपल्या अहित करणारास जिंक. २ 'सप्तपदि' चा अर्थ बरोबर सात पावलें जाणें असा आहे. कोणाबरोबर आपण सात पावलें जाणें हें त्याशीं आपली मैत्री दृढ झाल्याचें लक्षण आहे. त्यास अनुसरून हा प्रघात आहे, सप्तपदि होण्यापूर्वीं विवाह संबंध तुटूं शकतो. पण त्यानंतर मात्र तो दृढ झाला असा परिपाठ आहे.



आपणही ती नये आचरूं गणून अप्रिय चित्तीं ॥ ३४ ॥
सलज्जता ही विनम्रतेची शिक्षा अज्ञ वधूतें ॥
पोरबुद्धिचें प्रमादकश्मल सलज्जता ती धूते ॥ ३५ ॥
ठेवीं आतां पतिव्रत सदां विसरूं नको या गोष्टी ॥
जातों आह्मी सुखें ऐस तूं होउं नको गे कष्टी " ॥ ३६ ॥

आध्याय चवथा समाप्त.

---

## अध्याय–पांचवा.

---

टाकुनियां ती कौमार्यातें सुवासिनी मग झाली ॥
तें सार्थक निज नाम कराया सासरींच राहिली ॥ १ ॥
गृहकर्में जी योग्य आचरी वृत्ति प्रसन्न दावी ॥
अशीं पतिगृहीं सुष्ठु वसे ती सुवासिनी मानावी ॥ २ ॥
सावित्री ती असे एकली श्वशुरगृहांत नवोढा ॥
उल्हासें परि वर्ते दावी माहेरा नच ओढा ॥ ३ ॥
असे पतीतें समवाहीनी प्रपंच भारा आर्या ॥
तिलाच मानी नाथ तिचा कीं खरी अंतरीं भार्या ॥ ४ ॥
अर्धांगी हें नाम होतसें अन्वर्थक त्या सतिला ॥
संसृतिकर्मीं साह्य करी जी अर्धांगापरि पतिला ॥ ५ ॥

---

१नवीन विवाहित मुलीस सासरीं असतां लाजण्यास शिकवितात ( तें लाजणें. ) २ मर्यादशीलपणाची.३मार्ग(सूचना)४ कुंवारपणाला. ५ लग्न झाल्यानंतर. ६चांगली.७नवीन विवाह झालेली स्त्री.८पोषणास योग्य.

रथरूपीं हा संसार तया पुंस्त्री चक्रद्वय हें ॥
यास्तव दोघां समकर्तव्यचि आहे रथवाहन हें ॥ ६ ॥
भूषण मुख्य स्त्रीजातीचें शालीनत्व गणावें ॥
भूषाकर तें नंतर त्यांना रूपवत्व मानावें ॥ ७ ॥
आभरणादिक इतर भूषणें साधन सुंदरतेला ॥
भूषण उत्तम त्याहि मधें तो स्वपतिच पतिव्रतेला ॥ ८ ॥
**सावित्री**चे ठायीं असें जरि कुलीनशालीनत्व ॥
हृदय तिचें परि डागे जाणुनि पति--आयुर्हीनत्व ॥ ९ ॥
अवचित आलें मनीं एकदां स्वस्थचित्त ती बसतां ॥
पतिनिधानाचा काळ काळजीपूर्वक मोजित असतां ॥ १० ॥
डागिना हा मुख्य आपला हरून न्याया स्वर्गीं ॥
आला निकटच जगसंहारक काळ दिनद्वय-मार्गीं ॥ ११ ॥
हताश झाली न रुचे अन्न न सुचे काम मग तीतें ॥
सुदतीतें त्या गवसे संकट टाळाया न गती तें ॥ १२ ॥
पति सर्वस्वचि साध्वीतें जी पतीस तनुमन वाहे ॥
त्याच्या विरहें कायें नच तिचा कायें शुगब्धीं वाहे ॥ १३ ॥
सासुसासऱ्या दुखमयी ही न करी ती श्रुत वार्ता ॥
होइल जाणुनि दुःसह अतितर अधींच त्या व्यसनार्ता ॥ १४ ॥
लहान होती वयें जरी तरि तिचें प्रौढ सुविचार ॥
अल्पमतीतें तिच्या न देती करूं कधीं ते चारे ॥ १५ ॥

१ उत्तम स्वभाव असणें. २शोभादायक. ३ वस्त्रालंकार वगैरे. ४ दोन दिवसांच्या अवधीवर. ५प्रश्नार्थक सर्वनाम. ६ देह. ७ शोकरूपसमुद्र.



अथवा ज्ञानीजनोपदिष्टप्रांतीं विचरे त्यातें ॥
तत्सद्वर्तन तोंचि व्यसनीं येइं पहा साह्यातें ॥ १६ ॥
'मृत्यु' द्व्यक्षरि शब्दचि भीतिद त्यांतुन निज देहाचा ॥
त्याहिवरी तो अल्पवयी मग ऐकवेल त्या कैंचा ॥ १७ ॥
जाणुनि हें स्वपतीस कथाया धीर न होय सतीचा ॥
अथवा काढिल केंवि मुखांतुनि दुश्राव्य अशी वाचा ॥ १८ ॥
तुंब जलें सर तसें तियेचें अंतर दुःखें भरलें ॥
त्या योगें तन्मनोविकारहि तन्मय होउनि गेलें ॥ १९ ॥
अशा दुस्थितीमध्यें व्याकुलमना पाहुनी तीतें ॥
सासुसासरा पति नेणति या वृत्त्यंतर हेतूतें ॥ २० ॥
असो लोटला तो दिन दुसरा आला तोंही गेला ॥
कालगती कीं अविलंबी हा अनुभव तीतें आला ॥ २१ ॥
शेवटील तो दुर्दिन उगवे ज्येष्ठ शुद्ध पक्षाचा ॥
तसाहि अंतिम तिच्या असे तो शुद्धचि सौभाग्याचा ॥ २२ ॥
तीन दिवस करि सती उपोषण पोषण निज सौभाग्या ॥
व्हाया पूजी गौरीहरही वृद्धि तशी पतिभाग्या ॥ २३ ॥

१ अविचाराचे प्रकार. २ विद्वान लोकांनीं सांगितलेल्या मार्गानें. ३ न ऐकण्याजोगी. ४ सरोवर. ५ तिचे सर्व मनोविकार. ६ दुःखमय होऊन गेले; ह्मणजे केलीं पाहिजेतच तेवढीं जरीं ती कामें करी अथवा कोणी बोलल्यास बोलावें, हंसल्यास हंसावें, तरी पूर्वीप्रमाणें तिचें प्रफुल्ल मुख नसे; सर्व अंतःकरण दुःखमय होऊन गेलें असा भाव. ७ जिचें मन दुःखाकूल झालें आहे अशी. ८ पूर्वीच्या व आतांच्या वृत्तींत हें जें अंतर पडलें त्याचा हेतु. ९ कोणासाठींहि खोळंबून राहणारी नाहीं. १० शेवटील.

चढे जसा तो दिन दिनकरेंही नभा आक्रमित जाई ॥
उदास निष्प्रभ दीन तसा मुखचंद्र सतीचा होई ॥ २४ ॥
होऊं नेदी क्षणहि पतीतें दृष्टि पुढूनि दूर ॥
झाली सर्पापरि पति-जीवित धनावनीं ती शूर ॥ २५ ॥
पुंस्त्रीचा हा धर्मचि त्यांहीं अन्योन्यावन करणें ॥
परस्परांच्या साह्यानें हा भवाब्धि दुस्तर तरणें ॥ २६ ॥
नित्यापरि तो सत्यवंत फलपुष्पार्थ निघे विपिनीं ॥
जाय तयासह सति आपणही श्वशुराज्ञा घेऊनी ॥ २७ ॥
सावित्रीतें मार्गी वदला सत्यवंत बहु गोष्टी ॥
परि तत्प्रेमळ वचनें होई अधिक मात्र ती कष्टी ॥ २८ ॥
सुरूप जो कीं गुणीहि ज्याचें प्रीतिरसें मन भरलें ॥
सरलें माझें भाग्य तरिच मी अशास या अंतरलें ॥ २९ ॥
क्षणोक्षणीं हा उद्वेग असा अंतःकरणीं येई ॥
त्या सतिच्या मग कशी पतीतें प्रत्युत्तर ती देई ॥ ३० ॥
"अपूर्व आग्रह सखे धरूनी आलीस वनीं कां गे ॥
अससी कां तूं निर्विण्ण अशी मौन कशास्तव सांगे ॥ ३१ ॥
वडिलां सन्मुख नये प्रिये गे विचारावयाला जें ॥
तें पुसतां कां निर्जनहि वनीं न कळे तव मन लाजे ॥ ३२ ॥
टाकीं आतां मूकपणा हा तेंवि उदासीनत्व ॥
चारुमुखा या येई तेणें प्राणेश्वरि हीनत्व ॥ ३३ ॥
विशालनयने अनेकविध ही वनशोभा अवलोकीं ॥
पहा वृक्ष हा धवल तुला त्या पुष्पमिसें हंसतो कीं ॥ ३४ ॥

१ सूर्य. २ तेजरहित. ३ दुःखोद्गार. ४ उदासीन. ५ सुंदरमुखाला.



समीपस्थ वनपंक्तिमधूनी मंदमंद हा येई ॥
सुगंध सीतळ पवन हरूनी मनस्ताप गे नेई ॥ ३५ ॥
हा आम्रावरि पिकें तत्पर्णीं आच्छादित कीं झाला ॥
जाणावें त्या स्वरेंचि जैसें सत्कृत्यें कुलिनाला ॥ ३६ ॥
वृक्षस्थित हा सभार्य राघू सफल वृक्ष शाखेला ॥
करें ओढूनी शिरीं धरी बघ अशी करी गे लीला ॥ ३७ ॥
शुक हा वाटे सूचवितो कीं वेदांच्या शाखांचें ॥
मानावें तें फल सर्वांहीं शिरसा योग्याचि साचें ॥ ३८ ॥
अझुनि कां गडे उदासीनता तव ठायीं ही भासे ॥
बघुनि रम्य वन तसा जवळ हा प्रिय तव नाथ उभासे ॥ ३९
फळें फुलें हीं पुरीं जाहलीं समिधा आतां घेऊं ॥
संध्यासमयापूर्वी सखये परत वरीं गे जाऊं " ॥ ४० ॥

अध्याय पांचवा समाप्त.

---

## अध्याय—सहावा.

समिधासंचय सत्यवंत करि वटवृक्षावरि चढुनी ॥
अधःस्थळीं सति सचिंत पतिवरि दृष्टि बसे लावूनी ॥ १ ॥
अतिश्रांत तो झाल्यावर मग उतरूनि येतां खालीं ॥

१ शेजारच्या. २ कोकिळ. ३ कुलीन मनुष्य केवळ त्याच्या चांगल्या कृतीच्या प्रसिद्धीवरून ओळखावयाचा. त्याप्रमाणें हा कोकीळ जरी झाडाच्या पानांत कोठें बसला आहे हें दिसत नाहीं तरी त्याच्या मधुर स्वरावरून तो कोठें आहे हें जाणतां येतें. ४ संध्याकाळ होण्यापूर्वीं.

शूल शिरीं उद्भवून अवचित, मूर्च्छा त्यातें आली ॥ २ ॥
त्वरें जाय सति पतिसन्निध तन्निधनकाळ[1] जाणूनी ॥
अंकीं घेई शीर तयाचें पाहे मुख निरखूनी ॥ ३ ॥
मरणोन्मुख पति झाला ऐसें येतां तिजला कळुनी ॥
मग तन्निर्मल मुखचंद्रावरि शोकमेघ ये वळुनी ॥ ४ ॥
" होत्यें ज्याला भीत बाइ तो दिवस शेवटीं आला ॥
कसा निर्दयें मत्सौभाग्यीं अचुक घातला घाला! ॥ ५ ॥
नाहीं डोळे भरून पुरतें हें मीं मुख पाहीलें ॥
मर्यादातिक्रमभीतीनें सदां दूर राहील्यें ॥ ६ ॥
नाहीं एकहि कधीं स्पष्टसें प्रेमवचन मी वदल्यें ॥
दुर्दैवें मी अतां कशी ह्या सर्वांसच कीं मुकल्यें ॥ ७ ॥
वाटतसे संकोच अझूनी करूं काय परि आतां ॥
न आवरे मज शोकवेग हा क्षमा करावी नाथा " ॥ ८ ॥
वक्षस्थळ घे पिटूनि हातें शीर तसें धरणीतें ॥
मुखीं मृत्तिका भरी निवारी कोण तिच्या करणीतें ॥ ९ ॥
ठेवुनि मुख पतिमुखावरी मग आक्रंदे बहु बाला ॥
पतिदेहा कंवटाळी[2] वरिवरि जरि तो मृन्मय झाला ॥ १० ॥
सतिदुःखाचें कोण करी परिमार्जन निर्जन रानीं ॥
करी शोक ती विपिन यापरी भरी विलापरवांनीं ॥ ११ ॥
" मला एकली कसें टाकुनी निर्जन रानीं जातां ॥
हेंच काय परि जगत् सर्व मज जीर्ण अरण्याचि आतां ॥१२॥
भग्नमनोरथ नष्टसुखं[3] कशी आतां मागें राहूं ॥

१ त्याच्या मृत्यूचीं वेळ. २ वारंवार. ३ हीं दोन सावित्रीचीं विशेषणें.



कोसळला जो दुःखगिरी हा कसा प्राणपति साहूं ॥ १३ ॥
होतों सेवा करीत ज्यांची आपण अत्यानंदें ॥
क्षीण कसाही न मानून तो परस्परांच्या छंदें ॥ १४ ॥
विचारून त्या वडिलां आलों आपण संगें विपिनीं ॥
एकटीच मी परत तयांतें काय सांगु जाऊनी ॥ १५ ॥
मला एकलीलाच काय परि तुह्मी त्याहि आधार ॥
तोडि तोहि दुष्प्रसंगरूपी या खड्गाची धार ॥ १६ ॥
आतां व्हावी कशी गति पुढें त्यांची काय वदावें ॥
निराधार वाताहत वृक्षें उन्मूलून पडावें ॥ १७ ॥
न कळे घडला दोष काय वा झालासे अपराध ॥
ह्मणून सौख्या सौभाग्यातें ये सर्वांच्या बाध ॥ १८ ॥
मार्गी येतां एक शब्द ही वदल्यें नाहीं त्याचा ॥
प्राणनाथ तुह्मातें आला रोष काय हा साचा ॥ १९ ॥
प्रेम मजवरी अखंड होतें कसें एकदम सरलें ॥
सस्मित भाषण वीक्षण सारें तुमचें मज अंतरलें ॥ २० ॥
आठवून यापरी मागल्या प्रेमगोष्टि एकेक ॥
पशुपक्ष्यांसहि करुणा येऽसा साध्वि करी ती शोक ॥ २१ ॥
सन्मुख आले **यमराज** असे त्या साध्वीतें कळलें ॥
काढुनि तत्पति-लिंगदेह मग दक्षिण-पंथ निघाले ॥ २२ ॥
टाकुनि तेव्हां ती पतिदेहा निज अबलाभीरुत्वें[1] ॥
तत्सहगमनें[2] राखि आपलें पातिव्रतेचें सत्व ॥ २३ ॥

१ बायकांचा जो स्वाभाविक भित्रा स्वभाव तो. २ पतीच्या जीवाबरोबर जाण्यानें ह्मणजे यमधर्माच्या मागोमाग जाण्यानें.

सावित्री कर जोडून वदे मार्गी यमधर्मातें ॥
" या कन्येच्या प्रणयपुरस्कृत ऐकावें विनतीतें ॥ २४ ॥
मातृभक्ति दे कर्मभूमधें नृजन्म भजकालागीं ॥
चिरंतनें असा पितृभक्तीनें वास होतसे स्वर्गी ॥ २५ ॥
समासाद्य कीं गुरुशुश्रुषें ब्रह्मलोक तो होई ॥
सर्वधर्मफलभोक्तृत्व जना अशा त्रिकर्मे येई ॥ २६ ॥
हें अनुशासन धरून चित्तीं त्यापरि वर्तन करितां ॥
मत्पति कां मग अल्पवयांतचि त्या निजपाशें धरिता "॥ २७॥
सासुसारा अंध निराश्रित तनय त्यांस एकुलता ॥
कुलतारक हा नेतां त्यांतें ये न कशी व्याकुलता ॥ २८ ॥
न्यायप्रचुर सतीचीं वाक्यें ऐकुनि यम आनंदे ॥
थांबुनिया तो प्रेमळ वचनें तीतें प्रत्युत्तर दे ॥ २९ ॥
" सत्यचि वदसी श्रेष्ठ धर्म हा मातृ-पितृ-गुरु-भक्ती ॥
याहुनि अन्य न देई इहपरसुखलाभासह मुक्ती ॥ ३० ॥
धर्मतत्व हें साध्वी तव पति अनुसरला सद्भावें ॥
त्या सुकृताचें यथायोग्य फल मिळेल तें ऐकावें ॥ ३१ ॥
स्वर्गसौख्य हा भोगून पुढें ब्रह्मलोक पावेल ॥
असाल तूंहि मिळून पुढें त्या जेंवि पादपा वेल ॥ ३२ ॥
घे हा वर जा परत आश्रमीं श्रमी वृथा कां होसी ॥
राजवैत्रसहें नेत्र हि येतिल सासूतें श्वशुरासीं " ॥ ३३ ॥

१ विनयपूर्वक. २ निरंतर. ३ प्राप्त. ४ वृक्षाला. ५ सासुसासऱ्यांना डोळे येतील आणि त्यांचें राज्य त्यांना मिळेल.



" भवदाज्ञा मज मान्य, " यावरी साध्वि वदे यमधर्मा ॥
"अर्थचतुष्कप्रापक मी परि आचरिलें नच कर्मा ॥ ३४ ॥
आधीं पितरां मी एकुलती तीहि जाहलें दुहिता ॥
असतां सुत तरि झटता होऊन अखिलज्ञानविदु हिता ॥ ३५ ॥
असते कन्या दुःखद पितरा नाशक ती तद्द्रव्य ॥
त्यांतुनि जाळी वन्हिवांचुनी त्यांसि तिचें वैधव्य ॥ ३६ ॥
दावुं कसें हें मुख जें त्यांहीं पाहियलें नवसून ॥
सासु सासऱ्या ऋणाइतापरि ही मी होइन सून ॥ ३७ ॥
पतिशुश्रूषा यथायोग्य हि न घडली या देहानें ॥
याचें सार्थक होवो आतां तरि तत्सहगमनानें ॥ ३८ ॥
येव वेल तों येईन अशी पत्यनुलक्ष्येंकरुनी ॥
अशक्य हें अनुगमन होय तरि तनु देइन टाकूनी" ॥ ३९ ॥
हें निश्चय बल त्या अबलेचें पाहुनि यम साश्चर्ये ॥
द्वितीय वर दे जो तज्जनकहि मिळवी न तपश्चर्यें ॥ ४० ॥
"प्रिय कन्ये जा परतुनि तुजला शतबांधव होतील ॥
गुरुजन तुजवर गे प्रीतीनें कृपामृतहि होतील" ॥ ४१ ॥
"इहकर्तव्यच आतां झालें, " पुन्हा वदे सावित्री. ॥
" अनुग्रहें या ह्मणतिल मजला उभय कुलां उद्धर्त्री ॥४२॥
परी उचित जें पतिव्रतेतें तें मजकरवीं कार्य ॥

१ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार प्रकारच्या पुरुषार्थांची प्राप्ति करून देणारें ( कर्म ). २ सकल विद्यानिपुण. ३ अश्वपतीनें तपश्चर्याकरून कन्याच मिळविली; पण हिनें या वेळीं असा वर घेतला कीं तेणेंकरून अश्वपतीला शंभर पुत्रांची प्राप्ति झाली. ४ सासरचीं माहेरचीं सर्व वडील माणसें. ५ कृपेनें.

नच घडलें, कीं स्त्रीजन्म कसा होय सफल हे आर्य ॥ ४३॥
पति सेवा करि सदैव दैवत गणी न लोकीं अन्य ॥
संरक्षी पति-जीवित वित्तहि कुटुंबिनी ती धन्य ॥ ४४ ॥
धर्माचरणीं अनुकूलत्वें साह्य पतीतें करते ॥
विनयानें पति-कोपावसरीं स्वतः मौन जी धरते ॥ ४५ ॥
प्रसन्न आस्यें सलज्ज हास्यें पति- हत्तापा नाशी ॥
उत्सुक असते सदां तयाच्या आज्ञामृतपानाशीं ॥ ४६ ॥
समवर्तन जी ठेवी संपत्कालींहि विपत्कालीं ॥
झाली तीच ह्मणावी इहपर लोकांत भाग्यशाली ॥ ४७ ॥
अशा सतीच्या धर्मार्थादिक इच्छापूरण कर्ता ॥
धर्ता स्वकरीं संसृतिमार्गीं तो एकचि तद्भर्ता ॥ ४८ ॥
वृक्षलतेला पतिव्रतेला तेवि कांत आधार ॥
बाधा रविकैर तिलाँ हिलाँ तरि अनाथपण करणार ॥ ४९ ॥
वस्त्राभरणें मंडित तनु ही ज्या सन्मुख नाचावी ॥
वैधव्याक्षर दुष्ट कशी ती त्यामार्गे वांचावी ॥ ५० ॥
मी धर्माची कन्या तुमची धर्म तुह्मी प्रत्यक्ष ॥
व्यसनवाँरणा निवारणास्तव व्हा आतां हर्यक्षँ ॥ ५१ ॥
ह्मणतां कन्या या देहातें हातें कां बुडवीतां ॥
दुःखाब्धीं, हा मनोरथांकुर कां माझा खुडवीतां" ॥५२ ॥
या समयीं त्या सावित्रीचा कंठ भरूनी येई ॥

१ मुखानें. २ सूर्याचे किरण. ३ वेलीला. ४ पतिव्रतेला. ५ पतिवांचुन जीवित. ६ दुःखरूप हत्तीचे. ६ सिंह.



समापनोस्तव या स्तवनाच्या शिर ठेवी यमपायीं ॥ ५३ ॥
यमास ही या निर्मल सात्विक वचनें गहिंवर आला ॥
आशिर्वादासह तत्प्रियपति तीतें देतां झाला ॥ ५४ ॥
" नांदा आतां सौख्यानंदें दीर्घकालपर्यंत ॥
वडिलां सुखवा न्यायें वागा यशें भरा दिग्प्रांत ॥ ५५ ॥
पुत्रवती तूं होऊन पुढें पतिसह येशी स्वर्गीं ॥
नरनारींना पठतां नेइल चरित्र हें सन्मार्गीं " ॥ ५६ ॥
कृतार्थ होउनि सावित्री ती पतिसह परत निघाली ॥
प्रफुल्लवदनें त्यातें सारें वृत्त सांगती झाली ॥ ५७ ॥
टळतां संध्यासमय काळजी इकडे वडिल करीति ॥
उद्भवून कीं अनेक शंका त्यातें पीडा देती ॥ ५८ ॥
इतक्यामध्यें दोघांचे ध्वनि अवचित कर्णीं पडले ॥
तृष्णापीडित चातकवदनीं घनबिंदु तसे गमले ॥ ५९ ॥
सावित्री मग होऊन पुढें दोघांच्या नेत्रांतें ॥
करितां हस्तस्पर्श ये पुनः दिव्य दृष्टि कीं त्यांतें ॥ ६० ॥
यमधर्मानें दिलें या परी प्रसन्न जें होऊन ॥
पूर्णपणें तें सफल सर्वही झालें कीं वरदान ॥ ६१ ॥
वयोवृद्धता स्वकीय जाणुनि अर्पी राज्य सुताते ॥
द्युमत्सेन नृप; याहुनि दुसरें करणें काय सु ताते ॥ ६२॥
असो, अशी त्या सावित्रीनें करून उज्वल कीर्ति ॥

१ आतापर्यंत जी प्रार्थना केली तिचा शेवट करवेना ह्मणून एकदम डोकें पायावर ठेवून, यांत काय तें समजून घ्या, असा तिचा पुढें भाव. २मूलाला ( सत्यवान ). ३ चांगल्या बापानें.

आजवरी व्रतरूपें होउन राहे स्मारक मूर्ति ॥ ६३ ॥
ऐकतील जे चरित्र हें ते असें सुवर्तन करितां ॥
अमर जगीं या राहतील कीं मजही श्रमसार्थकता ॥ ६४ ॥

## —फलश्रुति—

योडक्यांत शेवटीं वाटतें फलश्रुती सांगावी ॥
कळेल तेणें ही कृति ध्यावी, ऐकावी, का गावी ॥ १ ॥
श्रवणें पठणें रंजवील ही मननें उपदेशील ॥
स्वकीय कल्याणेच्छु जनांचा भवव्याधि नाशील ॥ २ ॥
उदार आश्रय हिला देउनी जे संग्रह करतील ॥
निज भाषेचें अल्प तरी ते उतराई होतील ॥ ३ ॥
हिच्या आदरें प्रत्यक्ष फलें अशीं इष्ट आहेत ॥
माझ्या भगिनींना तीं होवो सुखें प्राप्त हा हेत ॥ ४ ॥
बरवे इत्युपनाम वामनात्मजें अनंतें रचिलें ॥
सुबोधपर हें काव्य भक्तिनें ईशपदीं अर्पीलें ॥ ५ ॥

---


## विक्रीस तयार असलेलीं पुस्तकें.

( किमती शिवाय टपाल खर्च निराळा पडेल. )

स्त्रियांकरितां.

# सावित्री चरित्र.

## ( गद्यपद्यात्मक. ) किंमत ८३ आणे.

( सुधारून वाढविलेली आवृति दुसरी. )

याची रचना फारच मनोरंजक अशी झाली आहे. या पुस्तकाचें वाचन प्रत्येक सुशील स्त्रियांनीं आवश्य करावें. याचे चांगूलपणाविषयीं. ऑनरेबल राव बा. मा. गो. रानडे, प्रोफेसर बा.गं.टिळक, आणि माजी मराठी ट्रान्सलेटर रा. रा. रावजी सदाशिव गोडबोले. यांचे उत्तम असे अभिप्राय आहेत-

# सौभाग्य मंदिर.*

## ( भाग पहिला. ) किंमत १२ आणे.

या पुस्तकांत असलेले विषयः—१ स्त्रियांची योग्यता, २ स्त्रियांचें कर्तव्यकर्म, ३ स्त्रियांचें भूषण, ४ स्त्रियांचें दूषण,

---

* या पुस्तकाचा दुसरा भाग हल्लीं छापत आहे. त्यांतील विषय येणेंप्रमाणें:—

१ स्त्रियांचे आवडते खेळ, २ स्त्रियांची सुंदर गाणीं, ३ स्त्रियांचीं मंगल कार्यें, ( ऐतिहासिक स्त्रियांच्या गोष्टी. ) ४ रमाबाई पेशवे, ५ आनंदीबाई पेशवे, ६ अहिल्याबाई होळकरिण, ७ कृष्णाकुमारी; ८ लक्ष्मीबाई झांशीवाली, ९ रोषनबेग, १० पाद्मिनी, ११ मस्तानी, १२ लवंगी जगन्नाथ राययांची, १३ तारा, १४ वगैरे.

५ स्त्रियांच्या आवडत्या गोष्टी, ६ स्त्रियांवरील कांहीं विशेष प्रसंग, ( पुराण प्रसिद्ध स्त्रियांच्या गोष्टी. ) ७ चांडिली आणि सुमना, ८ द्रौपदी आणि सत्यभामा, ९ सावित्री, १० सुकन्या, ११ चुडाला, १२ विदुलेचा पुत्रास उपदेश, १३ शकुंतलेचें राजसभेंत भाषण, १४ सत्यभामेचें पतिदानव्रत, १५ लक्ष्मीगर्वपरिहार, १६ रुक्मिणीची पत्रिका, १७ सीता आणि लोपामुद्रा, १८ लक्ष्मी आणि पार्वती, १९ द्रौपदीचें मनक्षामोडेपणा, २० तारा, २१ मंदोदरी, २२ सुलोचना, २३ श्रीकृष्ण व गोपी यांचा संवाद आणि २४ स्त्रियांचें परावलंबन.

---

## स्त्रीशिक्षण ज्ञानमाला.

किंमत १२ आणे.

---

## सासुरवास चंद्रिका.

( पूर्वभाग. ) किंमत ७ आणे.

सदरचा.

( उत्तरभाग. ) किंमत ५ आणे.

---

## मुलींची सासरीं वागणूक.

किंमत ६ आणे.

---

## संसारदर्पण. किंमत १० आणे.

---



सुरस व मनोरंजक ऐतिहाासिक नवी कादंबरी.

# सुशील राधा आणि सद्गुणी कृष्णराव

अथवा

## दक्षिण महाराष्ट्र देशांत १८५७ सालीं झालेल्या बंडाची दुःखपरिणामी ऐतिहासिक कादंबरी.

या पुस्तकाचें चांगुलपणाबद्दल विद्वानांचे उत्तम असे पुष्कळ अभिप्राय आहेत.

आजपर्यंत असें मनोरंजक व समप्रमाण पुस्तक कोठेंही झालेलें नाहीं. खरोखरची माहिती अनेक पुराव्यावरून मिळवून जो प्रकार घडलेला आहे, तो जसाच्या तसाच यांत हुबेहूब पण चटकदार रीतीनें वर्णन केलेला आहे. इ० सन १८५७ त दंगा होण्याचें कारण काय ? हा भाग लिहीत असतां इंग्लिशांचें व संस्थानिकांचें कसकसें वांकडें पडत चाललें व पुढें काय काय परिणाम झाला ? तो व या दंग्याचे वेळीं क्रूर संस्थानिकांनीं इंग्लिश कामगारांस व त्यांचे सोयिऱ्यांस त्यांच्या दुष्कर्माचें प्रायश्चित्त कसकसें भोगावयास लावलें ? तो भाग यांत चांगल्या रीतीनें वर्णन केलेला आहे. आजपर्यंत अशा माहितीचें खरें पुस्तक कोठेंही झालेलें नाहीं. कृष्णराव यांचें धाडस व शौर्य कसें होतें, तोही भाग यांत उत्तम रीतीनें वर्णन केलेला आहे.

## वीर हस्य, वरुणा, आणि शृंगार, हे मुख्य रस यांत आहेत.

( पूर्वभाग. ) किम्मत १२ आणे.

यांतील विषय.— १ संस्थानची जुनी माहिती, २ बंड होण्याचें कारण, ३ लढाईची तयारी फितूर आणि शोध, ४ म्यॉनशिन साहेबाचा मृत्यु, ५ लढाई, पराजय. आणि पळापळ, ६ ताडातोड मायलेकरांची भेट आणि बंडखोरांची धराधर, ७ यमुनाबाई आणि सावित्रीबाई यांचा मृत्यु, ८ योग्य न्याय, ९ लोभी बायको, १० औदार्यलोकिक आणि स्वाभिमान, ११ पळापळ आणि फुटाफुट, १२ कैद आणि फांशी.

## ( उत्तरार्ध. ) किम्मत बारा आणे.

यांतील विषयः—१ राज्यव्यवस्था, २ बालदशा शिक्षण आणि गृहस्थिति, ३ फितूरी कृष्णाजीपंत आणि बन्याबापू, ४ पौरुष किंवा तारुण्यतील हालचाल, ५ कामाची अदलाबदल आणि स्थलांतर, ६ एकास्त्रीजितमुसलमानांस कैद आणि मुक्तता, ७ व्यवसाय कारकिर्द आणि प्रवास, ८ न्यायनिस्पृहपणा आणि दुष्टांस दंड, ९ सुशील राधेचा मृत्यु, १० विष्णूस कैद आणि फांशी, ११ सगुणी कृष्णरावांचा मृत्यु, १२ उपसंहार.

---

## १ कुर्गप्रांताचा खरा इतिहास. ८६

## २ श्रीसेतुबंध रामेश्वरयात्रावर्णन. ८२

# नेटिव राजाचा इतिहास.

## ( भाग पहिला. ) किंमत १४ आणे.

खालील संस्थानांचा इतिहास यांत आहे.

१ बांसवाडा, २ प्रतापगड, ३ डोंगरपूर, ४ किसनगड, ५ धोलपूर, ६ अलवार, ७ बुंदी, ८ कोहा, ९ टोंका, १० केरवली, ११ सिरोही, १२ जेसलमीर, १३ रेवा, १४ उर्चा किंवा तेहेरी, १५ दातिया, १६ सांबतुर, १७ कच्छ, १८ भोपाळ, १९ धार, २० देवास आणि २१ जावरा.



## ( भाग दुसरा. ) किंमत १२ आणे.

संस्थानांची नांवें:— १ उदेपूर, २ जयपुर, ३ जोधपूर, ४ भरतपूर ५ बिकानेर आणि ६ जव्हार.

# गारुडी लोकांचा खेळ.

## ( भाग पहिला. ) किंमत ६ आणे.

# इंद्रजाल विद्या*

अथवा

गारुड्यांचे खेळ, नकला, कोडीं, प्रयोग, कूटप्रश्न वगैरे.

यांत समजण्या सारख्या आकृत्याही दिलेल्या आहेत.

## ( भाग पहिला. ) किंमत ८७ आणे.

## मनोरंजक नवीन पुस्तकें.

# दुराचरणाचें फळ वाईट†

अथवा

आजकालच्या स्थितीस अनुलक्षून लिहिलेली मनोरंजक कादंबरी.

## ( पूर्वार्ध. ) किंमत तेरा आणे.

सन्मार्ग जयीं दावणें ॥ तईं आडमार्ग निषेधणें ॥
कणग्रहार्थ त्यागणें ॥ कोंडा जेवीं ॥ १ ॥

—दासबोध.—

---

*यापुस्तकाचे आणखी १० भाग होतील व यापुढील भागांत भूत, मंत्र, तंत्र याचे उत्तम असे चमत्कारिक खेळ देऊं.

†याचा उत्तरार्ध "सदाचरणाचें फळ चांगलें" हें हल्लीं छापत आहे.

या पुस्तकाची रचना फारच मनोरंजक अशी केली आहे. आजपर्यंत जीं जीं कांहीं मनोरंमक पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत त्या सर्वांपेक्षां हें पुस्तक फारच उत्तम असें आहे.

हें पुस्तक प्रत्येक मनुष्यानें एकवार तरी पाहावें.

यांतील विषय:— १ उपक्रम, २ कुट्टनीगृह, ३ पितापुत्र, ४ धोक्यागुरु, ५ पुराण, ६ दोन गोष्टी, ७ स्थित्यंतर, ८ मेजवानी. ९ मित्रबोध, १० सासुरवाशीण, ११ चांडाळ चोकडी, १२ आचरणाचें फळ, १३ वेळ आली, १४ सवकमपलायन, १५ कृष्णरावाची चैन, १६ प्रीतिभेट, १७ कृष्णरावाची सुटका, १८ डोळे उघडले, १९ रामरावाचें दुखणें, २० प्रसंग टळला, २१ मित्रांची भेट, २२ भयंकर परिणाम, २३ तात्पर्य, २४ उपसंहार.

# न्हाणवली

## अथवा

# कादंबरीचा एक चुटका.

प्रत्येक स्त्रियांनीं आणि पुरुषांनीं वाचून पहावा.

**(न्हाणवलीच्या सुंदर गाण्यासह.) किम्मत चार आणे.**

हें पुस्तक अगदीं नवीन तयार केलेलें आहे. याची रचना हल्लींच्या पद्धतीस अनुसरून अशी आहे. ऋतुमति स्त्रियांस ३ दिवस अस्पर्श कां बसावें लागतें, याजबद्दल देवांचा पाप कथाकरितां झाला आहे, तो सर्व प्रकार यांत उत्तम तऱ्हेनें दाखविला आहे. त्या पूर्वी कथा वागत असत, व हल्लीं त्यांना कसें वागविताव त्याजबद्दल मनुस्मृति, धर्मसिंधु आश्वलायनगृह्यसूत्र, वाग्भट, सुश्रुत यांच्या ग्रंथाधारें हें पुस्तक लिहिलेलें आहे.

---




१ सावित्री आणि पुरुषोत्तम. .... .... .... ०५

२ न्हाणवली आणि ऋतुशांति.... .... .... .... ०५

३ तरुण बायको अथवा स्त्रियांची स्वतंत्रता .... .... ०५

४ स्वतंत्र विधवा आणि त्यांच्या तरुण मुली.. .... ०५

५ तरुण स्त्रियांची मौज. .... .... .... .... ०५

६ स्त्रियांची मंगल कार्यें. .... .... .... .... ०५

७ संगीत गोपीचंद नाटक. .... .... .... ०९

८ स्त्रियांचे नेत्र कटाक्ष. .... .... .... .... ०३


---

हीं सर्वपुस्तकें व याशिवाय आणखीं दुसरीं पुस्तकें खालीं सही करणार यांचेकडे विकत मिळतील. परगांवच्या लोकांनीं अगाऊ किम्मत पाठवावी किंवा व्हॉल्युपेबलनें मागवावी.

**नेटिव स्टेट बुक पब्लिशर.**

पत्ता:—कांदेवाडी, मुंबई, गिरगांव पोष्ट.

---

**अभिप्राय.**

'सावित्री' हें लहानसें पुस्तक ग्रंथकर्त्यांनें पूर्वी पाहण्यास पाठविलें होतें. त्या वेळीं कांहीं सूचना केल्या होत्या त्या लक्षांत वागवून हल्लीं पुस्तक छापिलें आहे, त्यांत बरीच सुधारणा केली आहे. दुसऱ्या भागांतील वनश्रीचें वर्णन व प्रथम्या भागांतील बोधपर मंगलाष्टकें चांगलीं साधलीं आहेत; एकंदरींत कविता सुबोध व सरस आहे. मुलींच्या शाळांतून हें पुस्तक उपयोगांत आणिलें असतां मनोरंजन होऊन बोध चांगल्या प्रकारें होईल, असा माझा अभिप्राय आहे.

(सही—ऑ० रा० ब०) महादेव गोविंद रानडे.

---

The "Savitri" which the author has been good enough to send me in proofs is undoubtedly an interesting small poem. The legend, I may say, is the favourite one in the Hindu household and the author has done well in selecting it for the subject of one of his first attempts in writing verse. The metre and the language are both suited to the subject and the verses read easy and continuous, while the interest in the story is well kept up............Poems of this kind on the popular household legends are the books which should be introduced in our girl-schools ............

BAL GANGADHAR TILAK, B.A.LL.B.
Prof. Fergusson College Poona.

---

The book as a poetical composition possesses merits. The story in its Marathi garb mostly approaches in interest and pathos to the original story in Sanscrit. The language is, in general, elegant and vigorous. The metre chosen is specially adopted to the expression of the pathetic sentiments, which is predominent in the story. The descriptions on several occasions are vivid and natural. The great fault of the poem is, that it is full of high Sanscrit words and expressions.........yet I must confess that the writer has some tact for poetry and a man of energy and perseverence.

RAWJI S. GODBOLE,
Late Marathi Translator E. D.

---

× × × ×

"या पुराणप्रसिद्ध महासाध्वीच्या चारित्राचे कर्ते रा. अनंत वामन बर्वे हे होत. यांच्या अंगीं भाषा चटकदार, व मुद्देसूद लिहिण्याची शैली चांगली असल्यानें, त्यांनीं या सावित्री कथेचें सार पहिल्यानें गद्यरूपांत फारच थोडक्यांत आणि चांगलें दिलें आहे.



पद्यरूपांतील चरित्र एकंदर साकी छंदांत आहे—तोंहि त्यांना चांगल्या प्रकारचें साधलें आहे असें आमचें मत आहे."

× × × ×

येथील वार्ताहर पत्रकर्त्यांनी याप्रमाणें आमच्या या पुस्तकावर प्रथम चांगला अभिप्राय देऊन मग त्याच लेखांत आमच्या प्रस्तावनेंतील एका लेखांशावर कांहीं टीका केली आहे. त्या टीकेस त्याच ठिकाणीं उत्तर देणें योग्य आहे असें वाटल्यावरून तें आह्मी येथेंच सविस्तर देतों. प्रथमतः वार्ताहर पत्रकर्त्यांची पुढील टीका पहा.—

"मि. बर्वे यांनीं या चरित्राचा प्रस्तावलेख 'हल्लींच्या सुधाऱ्याचा भूमिकेवर' बसून लिहिला असल्यानें—त्या पवित्र चरित्राला प्रस्तावनारूप गालबोट लाविलेलें दिसतें ! प्रस्तावलेखांतील एका परिच्छेदांत मि. बर्वे असें ह्मणतात, कीं "केवळ रोचनार्थ ह्मणून या 'वटसावित्री' व्रताची जी फलश्रुती सांगितलेली आहे-ह्मणजे सौभाग्य रक्षण होणें, व जन्मोंजन्मीं हाच पति मिळणें ही—आतांच्या सुशिक्षित विचारसरणीस कितपत खरी वाटेल याचा संशयच आहे. पण एवढें मात्र निर्विवाद राहील कीं, प्रस्तुत व्रतविषय, जी सावित्री, तिचें चरित्र मननपूर्वक श्रवण केल्यानें, तिची पतिनिष्ठा, तिचें धैर्य, तिचा ( एक प्रकारचा ) दृढनिश्चय, व यमधर्मांशीं भाषण करतांना तिचें चातुर्य, हे सर्व उन्नत गुण स्त्रियांना स्पृहणीय व अनुसरणीय होतील, यांत कांहीं संशय नाहीं. आह्मी तरी याच गुणांचा बोध स्त्रियांना होण्याकरितां हा एक अल्प यत्न केला आहे." व्रताचरणानें फलश्रुती मिळणार नाहीं, असा जर—आतांच्या सुशिक्षित विचारसरणीचा ठाम सिद्धांत ठरला असेल, तर सावित्री चरित्राची

× × × ×

किम्मत, केवळ घटकाभर करमणूक करून मन रंजनानें आयुष्याचा अंश व्यर्थ घालविण्यासारखी आहे. अशाच अर्थानें जर आमच्या या सुधारकचमूंतील शिपायास नांवा पुरता आमच्या धर्मांतील गोष्टींचा व व्रतांचा गौरव करणें असेल, तर तो त्यांनीं आजिबात खोडून द्यावा हेंच फार उत्तम होय. कारण ज्या सुधारकांचे एका-भावीं दुसरा पती करण्याचे स्त्रियांना व्यासपीठावर उभे राहून सतत उपदेश चालले आहेत, ज्या सुधारकचमूंतील ड्रेस अंगावर घालणाऱ्या शिपायांनीं, लग्नानें नाहीं–परंतु मनानें जो वरला, तो मागाहून अल्पायु आहे, असें समजल्यावर, ज्या सावित्रीचा सत्य-वानाला वरण्याचा निश्चय ढळत नाहीं–त्या परम पवित्र साध्वी-च्या चरित्राचा, अशा भ्रामक विचारांनीं छल करणें अत्यंत दोषार्ह आहे ! सुधारकांच्या व्याख्यानांमध्यें, ज्या स्त्रियांना पुरातन धर्मांविषयीं अश्रद्धा उत्पन्न करणारे, आणि 'अग्लि नवरा' व 'म्हातारडी सासूसासरे' यांचा कायद्यानें मजवर अम्मल चालत नसून, मी स्वतंत्र आहें, असे बोध होणारे–उपदेश चालले आहेत, त्यांच्या-पुढें राजकन्या सावित्री राज्यभ्रष्ट झालेल्या नवऱ्या बरोबर लग्न करून आंधळ्या सासूसासऱ्याची रानावनांत राहून सेवकरहित अनन्यभावानें सेवा करण्याचा निश्चय करते–त्या परमपूज्य साध्वीची गोष्ट या आतांच्या सुशिक्षित (?) विचारसरणीस काय होय?"

– × × –

व्रतादिकांना जी फल श्रुती सांगितली असते ती केवळ रोचनार्थ होय हें वाक्य आमचें स्वतःचें नाहीं. तें पूर्वापार आहे व तें वार्ताहरकर्त्याच्यानें असें कदापि लटकें ठरविलें जाणार नाहीं. तसेंच या व्रताचरणाची फलश्रुति–आजन्म सौभाग्यरक्षण व जन्मोजन्मीं हाच पति मिळणें ही–अ शीच खरी आहे असेंहि त्यांना सिद्ध करून दाखवितां



येणार नाहीं. कारण जन्मांतराच्या गोष्टी तर राहूं द्याच पण याच जन्मीं देखील सदर्हू व्रत खरोखर भक्तिभावानें आच-रणाऱ्या स्त्रियांसहि वैधव्य प्रसंग गुजरलेल्याचे दाखले कमी आढळणार नाहींत. तरीहि अज्ञान, देवभोळी व अंधश्र-द्धावान् जी मंडळी आहे तिचा भाव अशाहि फलश्रुती-वर कायमच राहणार आहे व म्हणूनच त्याच्याविषयीं आमचें कांहीं म्हणणें नाहीं. पण अलीकडच्या सुशिक्षित विचार सरणीचा ज्यांच्यावर संस्कार झाला आहे–व उत्तरोत्तर तोच पुष्कळांवर होत जाणार आहे–त्यांना मात्र ही फलश्रुति यथार्थ वाटणार नाहीं असा आम्हास संशय आहे, व तोच आम्ही प्रस्तावनेंत दाखविला आहे. वार्ता-हरकर्ते लिहितात कीं, फलश्रुती शिवाय या चरित्राची किंमत केवळ करमणुकीच्या गोष्टीप्रमाणें आयुष्यांश व्यर्थ घालविणारी आहे. आम्ही म्हणतों कीं, असें कां ? ही फल-श्रुति अलीकडच्या सुशिक्षित विचार सरणीस बरोबर नाहीं वाटली तरी या चरित्रापासून सावित्रीचे जे एकेक अपूर्व व उत्कृष्ट गुण अनुकरणीय वाटणार आहेत त्यामुळें हें चरित्र पठण एखादी कादंबरी वाचल्याप्रमाणेंच आयु-ष्यांश व्यर्थ घालवील असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. सु-शिक्षित विचार सरणीसहि ग्राह्यच वाटणारे कोणते गुण या चरित्रांत घेण्यासारखे आहेत ते आम्ही प्रस्तावनेंत स्पष्ट दाखविले आहेतच. आमच्या संबंधानें, 'सुधाऱ्याची भूमि-का,' 'सुधारक चमूंतील शिपाई' वगैरे कित्येक. शब्दांचें विनाकारण विधान या पत्रकर्त्यानें केलें आहे. व यावरून सुधारणा–सुधारक–सुशिक्षितपणा इत्यादिकांविषयीं त्यांचा दुष्टग्रह व कुत्सित बुद्धि मात्र पूर्ण प्रदर्शित झाली आहे.

एकाभावीं अनेक पति करूं इच्छिणारी व ‘ अग्ली नवरा ’ ‘ म्हातारडीं सासुसासरें ’ अशा शब्दांनीं गुरुजनांचा अपमान करणारी मंडळी केवळ ‘ सुधारक चमूंतच ’ आहे आणि वार्ताहारकर्ते आपणास ज्या कोणत्या प्रकारच्या ‘ चमूंत ’ गणीत असतील त्यांत म्हणजे ती नाहीं असें म्हणतां येणार नाहींच. अशी मंडळी मग ती जुन्यांत असो, कीं नव्यांत असो, त्यांनाच तर सावित्री सारख्या खऱ्या व थोर साध्वीचीं चरित्रें,आमच्या मतें, जरूर ऐकविलीं पाहिजेत. मात्र नवीन मंडळीनां त्या चरित्रांत केवळ रोचनार्थ सांगितलेल्या फलश्रुती खऱ्या वाटणार नाहींत,याकरितां त्यांत दुसऱ्या ज्या अस्पष्ट अनेक फलश्रुती–ग्रहणीय गुण–कीं ज्या कोणालाहि धिःकृत करण्यासारख्या नसून आचरणानें, नाहींपक्षीं निदान मनानें तरी,त्या शिरसावंद्यच होण्यासारख्या असतात त्याच त्यांच्या पुढें स्पष्टपणें मांडून दाखविल्या पाहिजेत. आम्ही याच हेतूनें हा यत्न केला आहे. हा आमचा यत्न वार्ताहरकर्ते त्या साध्वीच्या चरित्राचा ‘ छल ’ करणारा आणि म्हणून ‘ दोषार्ह ’ ठरवितात व आम्हास असा ‘ घाणेरडा ’ मार्ग सोडावा म्हणून हुकूम करतात; परंतु एखाद्या सत्तेच्या किंवा निदान बिनतोड शाहाणपणाच्या तरी अधिकाराचा कांहीं जोर त्या हुकूमास ते लावीपर्यंत त्यांचा सदर्हू हुकूम आम्ही खुशाल एकीकडे ठेवून, ‘आमच्या धर्मांतील गोष्टींचा व व्रतांचा ’ सद्यःकालमानास व अलीकडच्या सुशिक्षित विचार सरणीस अनुरूप असा यथामति व यथाशक्ति ‘ गौरव ’ करण्याचें आम्हीं पत्करलेलें व्रत यापुढें नेहमीं असेंच चालू ठेवणार आहों.

विक्रीस तयार.

# वट सावित्रीचें गाणें.

( आरतीसह. ) किम्मत दोन आणे.

ह्या गाण्याचा उपयोग ज्येष्ठ शु० १५ येस आमच्या सुश
स्त्रिया करीत असतात. व हें गाणें आजपर्यंत कोठेंही छापलेलें
सल्यानें पुष्कळ स्त्रियांस याची जरूरी होती, व ज्या वृद्ध स्त्रि
हें गाणें तोंडपाठ येतें त्यांचे घरीं जाऊन तें ऐकावें लागत अ
यामुळें बऱ्याच स्त्रिवर्गास या गाण्यामुळें कामाचा खोळंबा
होता. तो दूर व्हावा या हेतूनें आह्मीं पुष्कळ मेहनत घेऊ
गाणें एका वृद्धबाईकडुन ह्मणवून घेऊन तें लिहून तयार केलें
आणि याच्यांत फार जुने शद्ब असल्यानें स्त्री वाचकांस तें स
ण्यास त्रास पडूं नये ह्मणून कठिण शद्बांवर पुष्कळ टिपा दि
आहेत. या गाण्याची रचना एका स्त्रियेनेंच केलेली असल्य
यांतील वर्णनें फार मनोरंजक असून बोधपर अशीं आहेत.

हें गाणें सुरावर ह्मणूं लागलें असतां स्त्रीवाचकांस तर मौज
टेलच पण त्यांत पुरुषानेंही ऐकल्यास हें गाणें संपल्याशिवाय
च्यानें जाववणार नाहीं. अशी याची रचना मोहक आहे.

गाणें झाल्यानंतर बायका वटसावित्रीची एक आरती
असतात, ती आरतीही कोठें अद्यापि प्रसिद्ध झालेली नाहीं
आह्मी पुष्कळ खटपट करून या गाण्याचे शेवटीं दिली आहे.

हें गाणें मुलींच्या शाळेंत दररोज ह्मणण्यास सुरू केलें अ
यापासून पुष्कळ उपयोग होईल. हें पुस्तक स्त्रियांस जवळ
गतां येण्याकरितां लहान सांच्याचें मुद्दाम केलें आहे.

( हें पुस्तक खालील पत्त्यावर विकत मिळेल. )

नेटिव स्टेट बुक पबलिशर.

पत्ताः—कांदेवाडी मुंबई, गिरगांव पोष्ट.